महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे **जीवनदीप वार्ता**

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे | Rs.2/- | कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

सोमवार ■ १२ मे २०२५ ■ वर्ष - सहावे ■ अंक ३१३ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**प्रतिनिधी हवे आहेत**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता करिता खालील ठिकाणी प्रतिनिधी नियुक्त करणे आहे. इच्छुकांनी संपर्क करावा


• मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर • बोईसर • वसई • विरार • भाईंदर • पनवेल • वाडा • बदलापूर • शहापूर • आसनगाव • भिवंडी • कसारा • कर्जत • सरळगाव • म्हसा • धसई • अंबरनाथ • विठ्ठलवाडी • उल्हासनगर • टिटवाळा • शहाड • कोनगाव • आंबिवली • दिवा • कळवा

दैनिक 'ठाणे जीवनदीप वार्ता'
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.)
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९०८२६ ६४७८१

# भारत-पाक युद्धविराम, मात्र 'ऑपरेशन सिंदूर' कायम !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी दिल्ली : पेहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने कठोर पावले उचलत पाकिस्तानला चोख प्रतिउत्तर दिले. अमेरिकेच्या मध्यस्थीने पाकिस्तानने युद्ध थांबवण्याची विनंती केल्यानंतर भारत आणि पाकिस्तान दोघांनीही काल (१० मे) युद्धबंदीची घोषणा केली होती. मात्र, काही तासांतच पाकिस्तानने युद्धबंदीच्या अटी मोडत पुन्हा एकदा काश्मीर खोऱ्यात गोळीबार सुरू केला. या पार्श्वभूमीवर भारतीय वायूदलाने केलेल्या एका महत्त्वपूर्ण ट्विटमुळे नव्या घडामोडींना सुरुवात झाली आहे.**



## 9 दहशतवादी तळांवरील 100 हून अधिक दहशतवादी ठार

## वायूदलाने दिली सविस्तर माहिती

## पाकिस्तानचे ४० तर भारतीय लष्कराचे ५ जवान शहीद

### - डीजीएमओ लेफ्टनंट जनरल राजीव घई

**ऑपरेशन सिंदूर सुरूच?**

भारतीय हवाई दलाने स्पष्ट केले आहे की, ऑपरेशन सिंदूर अंतर्गत दिलेल्या सर्व जबाबदाऱ्या अत्यंत अचूकता आणि व्यावसायिकतेने पूर्ण करण्यात आल्या आहेत. या मोहिमा राष्ट्रीय सुरक्षेच्या उद्दिष्टांशी सुसंगत, काळजीपूर्वक आणि नियोजनपूर्वक राबवण्यात येत आहेत. सध्या ऑपरेशन्स सुरू असल्याने, त्याबाबत सविस्तर माहिती योग्य वेळी दिली जाईल, असेही वायूदलाने नमूद केले.

**पाकिस्तानकडून विश्वासघात**

भारताने शांततेसाठी युद्धबंदी स्वीकारली असली, तरी पाकिस्तानने नेहमीप्रमाणे विश्वासघात करत पुन्हा गोळीबारास सुरुवात केली. या कृतीमुळे भारताने पूर्वीच दिलेली ताकीद — "पुन्हा हल्ला झाला तर युद्ध सुरू होईल" — आता प्रत्यक्षात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

**वायूदलाचे आवाहन**

सध्याच्या संवेदनशील परिस्थितीमध्ये भारतीय वायूदलाने नागरिकांना आणि माध्यमांना खोटी किंवा अप्रमाणित माहिती प्रसारित न करण्याचे आवाहन केले आहे. ऑपरेशन्सबाबत अधिकृत माहिती वेळोवेळी देण्यात येईल, असं वायूदलाने स्पष्ट केलं आहे. दरम्यान आज ऑपररेशन सिंदूरबद्दल सविस्तर माहिती देण्यासाठी भारतीय लष्कराच्या तिन्ही दलांकडून संयुक्त पत्रकार परिषद घेण्यात आली. यावेळी पाकिस्तान आणि पाकिस्तान व्यप्त जम्मू आणि काश्मीर येथील ९ दहशतवादी तळांवरील १०० हून अधिक दहशतवादी ठार झाल्याची माहिती डीजीएमओकडून देण्यात आली. ऑपरेशन सिंदूर बद्दल माहिती देण्यासाठी आज (११ मे) रोजी तीन्ही सेना दलांच्या डीजीएमओंनी पत्रकार परिषद घेतली होती.

यामध्ये भारतीय सैन्याकडून ऑपरेशन सिंदूरचा उद्देश हा दहशतवादी नेटवर्क उद्ध्वस्त करणे हाच होता. या अंतर्गत ९ दहशतवादी तळांना लक्ष्य करण्यात आले होते, भारतीय गुप्तचर यंत्रणांकडून या ठिकाणे निवडण्यात आली होती, ज्यापैकी काही पीओके मध्ये तर काही पाकिस्तानच्या पंजाब प्रांतात होती. लष्करच्या मुरीदके येथील तळाला देखील यामध्ये लक्ष्य करण्यात आले.







## मुरबाड शहरातील पथदिव्यांचे प्रश्न लवकरच मार्गी लागणार - मुख्याधिकारी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड, ता. ११ :** शहरातील पथदिवे गेल्या चार महिन्यांपासून नादुरुस्त अवस्थेत आहेत. स्थानिकांकडून याबाबत सातत्याने नगर पंचायतीकडे तक्रारी करण्यात येत आहेत. त्यानुसार पावसाळ्यापूर्वी दुरुस्तीची कामे पूर्ण करण्यात येणार असल्याने मुरबाड लखलखणार आहे.

शहरांमध्ये अनेक ठिकाणी पथदिवे बंद पडल्याच्या नागरिकांच्या तक्रारी होत्या. पथदिवे दुरुस्तीसाठी नगर पंचायतीतर्फे हायड्रोलिक शिडी असणारे वाहन नुकतेच खरेदी करण्यात आले आहे. आमदार किसन कथोरे यांचे हस्ते या वाहनाचे लोकार्पण करण्यात आले होते; मात्र या वाहनासाठी चालक मिळत नसल्याने उपयोग केला जात नसल्याचे नगर पंचायतीचे कर्मचारी सांगतात. त्यामुळे शिडीचा वापर करून कर्मचारी खांबावर चढत आहेत. पथदिव्यांसंबंधी तक्रारीसाठी नगर पंचायतीच्या कर्मचारी वैशाली देशमुख यांच्याकडे संपर्क साधण्याचे आवाहन नगर पंचायतीमार्फत करण्यात आले आहे; परंतु दिलेल्या क्रमांकावरून प्रतिक्रिया दिली जात नसल्याने मुरबाडकरांमध्ये नाराजीचा सूर आहे.

> **मुरबाड शहरात ज्या ठिकाणी पथदिवे नादुरुस्त झाले आहेत त्या ठिकाणी नवीन दिवे बसवण्याचे काम सुरू झाले आहे. त्यासाठी लागणारे साहित्य मागवण्यात आले आहे.**
> ❍ मनोज म्हसे
> मुख्याधिकारी मुरबाड नगर पंचायत

## किन्हवली सहकारी भात गिरणी संचालक पदी दत्तात्रय दिनकर यांची बिनविरोध निवड

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



**शहापूर :** शहापूर तालुक्यातील प्रतिष्ठित असलेल्या किन्हवली सहकारी भात गिरणीच्या संचालक मंडळाच्या २०२५/२६ ते २०३०/३१ च्या निवडणुकीत सहकार क्षेत्रातील दिग्गज असलेले माजी पंचायत समिती सदस्य दत्तात्रय दिनकर यांची संचालक पदी बिनविरोध निवड करण्यात आली. शहापूर तालुक्यातील मातब्बर नेते, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जेष्ठ नेते,कृषी उत्पन्न बाजार समिती शहापूर यांचेकडून सहकार क्षेत्रातील पुरस्कार प्राप्त व्यक्तिमत्व,खरेदी विक्री संघांचे माजी सभापती व विद्यमान संचालक, अस्नोली गावचे माजी सरपंच, माजी पंचायत समिती सदस्य दत्तात्रय मंगल दिनकर यांची किन्हवली शेतकरी सहकारी राईस मिलवर ओबीसी गटातून बिनविरोध संचालक पदी निवड करण्यात आली. किन्हवली पंचक्रोशीतील अनेक दिग्गजांनी दत्तात्रय दिनकर यांचा अनुभव पाहून आपले उमेदवारी अर्ज माघारी घेऊन त्यांची बिनविरोध निवड केली.दरम्यान किन्हवली राईस मिलच्या मतदारांचे व संचालकांचे दत्तात्रय दिनकर यांनी आभार मानले.दरम्यान सदर निवणूकीचे मतदान १४ मे २०२५ रोजी सकाळी ८ ते संध्याकाळी ४ वाजेदरम्यान होणार असून त्याच दिवशी मतमोजणी होणार आहे.

## कल्याण एसटी आगारचा कारभार पत्र्याच्या शेडमध्ये

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण, ता. ११ (बातमीदार):** कल्याण रेल्वेस्थानक परिसरात सध्या एका पत्र्याच्या शेडमधून एसटी आगाराचा कारभार सुरू आहे. ही वेळ कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या स्मार्ट सिटीच्या प्रकल्पामुळे त्यांच्यावर ओढावली आहे. आता हे पत्र्याच्या शेडमधील आगार थेट रेल्वेस्थानकापासून दूर असलेल्या बैलबाजार इथे स्थलांतरित करा, अशी मागणी एसटीकडे स्मार्ट सिटी विभागाकडून होत आहे. अशी कबुली कल्याण आगारप्रमुखांनी दिली आहे. तसेच ही मागणी प्रवाशांच्या सोयीसाठी झुगारणार असल्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला आहे.

> **स्मार्ट सिटीकडून एसटी आगार बैलबाजार इथे स्थलांतरित करण्याची मागणी केली जात आहे. त्यांना या परिसरात मोठी वाहने नकोत, त्याने त्यांच्या कामाच्या वेगावर परिणाम होत असल्याचे त्यांचे म्हणणे आहे; मात्र रेल्वेस्थानकातून मोठ्या संख्येने येणाऱ्या एसटी प्रवाशांना बैलबाजारापर्यंत बस पकडण्यासाठी येणे खूप अवघड आहे. या प्रवाशांची गैरसोय होऊ शकते. त्यामुळे त्यांचे आणि पर्यायाने एसटी महामंडळाचे नुकसान होऊ शकते. ही एसटी महामंडळाची बाजू नुकतीच स्मार्ट सिटीसोबत झालेल्या बैठकीत मांडली. तसेच इथून बैलबाजार इथे एसटी आगार नेण्यासाठी नकारदेखील कळवला आहे.**
> ● महेश भोये, एसटी आगारप्रमुख, कल्याण

कल्याण एसटी आगारात शुक्रवारी (ता. १) संध्याकाळी अहिल्यानगर इथे जाणारी एसटी बस तीन तास होऊन गेले तरी न आल्याने प्रवाशांनी वाहतूक नियंत्रकाला घेराव घालून जाब विचारला होता. अखेर हा वाद जादा बस सोडून सुटला. आता पत्र्याच्या शेडमधील आगारात अपुऱ्या सोयीसुविधा असल्या तरी बस प्रवाशांची संख्या अजून तरी घटलेली नाही. याचे कारण, जवळच असणारे कल्याण रेल्वेस्थानक हे आहे, मात्र आता स्मार्ट सिटीच्या सॅटिस प्रकल्पासाठी हे पत्र्याच्या शेडमधील आगारदेखील बैलबाजार इथे हलवण्याची मागणी स्मार्ट सिटी विभागाकडून एसटी महामंडळाकडे होत आहे. याची कबुलीच स्वतः कल्याण एसटी आगाराचे प्रमुख महेश भोये यांनी दिली आहे. तसेच एसटी महामंडळाच्या जिल्हा पातळीवरच्या अधिकाऱ्यांनादेखील इथून आगार हटवल्यास महामंडळाचे नुकसान होणार असल्याचे त्यांनी कळवले आहे.



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कोकणातील मालवणमधील राजकोट येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य दिव्य पुतळ्याचे अनावरण आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आलं. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, माजी केंद्रीय मंत्री नारायण राणे, मंत्री नितेश राणे यांच्यासह प्रमुख नेत्यांची उपस्थिती उद्घाटन सोहळा पार पडला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राजकोट येथील पुतळा कोसळल्याच्या घटनेचा उल्लेख करुन या पुतळ्याची उभारणी करणार असा निर्धार आम्ही केला होता असं वचन आम्ही महाराष्ट्राला दिलं होतं. त्यानंतर ९१ फुटांचा हा पुतळा तयार करण्यात आला आहे. किमान १०० वर्षे या पुतळ्याला काही होणार नाही असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

## ठाण्यात 'ऑपरेशन अभ्यास' मॉक ड्रिल यशस्वी

**ठाणे, दि.11 :** केंद्रीय गृह विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आयोजित करण्यात आलेले आपत्कालीन परिस्थितीसाठीच्या सज्जतेचे परीक्षण करणारे "ऑपरेशन अभ्यास" हे मॉक ड्रिल आज, दि. 11 मे 2025 रोजी ठाण्यातील लोढा अमारा, कोलशेत मैदानावर यशस्वीरित्या पार पडले. दुपारी 4.30 वाजता सायरन वाजवून या मॉक ड्रिलची सुरुवात झाली आणि त्यानंतर पूर्वनियोजित घटनाक्रमाप्रमाणे सर्व कार्यवाही अत्यंत प्रभावीपणे पार पडली.

जिल्हाधिकारी तथा नागरी संरक्षण दलाचे नियंत्रक अशोक शिनगारे, अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदीप माने व प्रांताधिकारी उर्मिला पाटील, नागरी संरक्षण दलाचे उपनियंत्रक विजय जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली आणि तहसिलदार उमेश पाटील, नायब तहसिलदार दिनेश पैठणकर, उपमुख्य क्षेत्ररक्षक बिमल नथवाणी, कमलेश श्रीवास्तव, विभागीय क्षेत्ररक्षक रुपेश निंबाळकर, अयुब शिकलगार, झहीर खान, शकुंतला राय, बुद्धदास जाधव, अरुण सातपुते, प्रमोदिनी जाधव, श्री.भुजबळ, मानसेवी निदेशक डॉ.प्रकाश ठमके यांच्या सक्रिय पुढाकारातून हे मॉक ड्रिल आयोजित करण्यात आले होते.

मॉक ड्रिलच्या दरम्यान, काल्पनिक परिस्थितीत एअर स्ट्राईक/बॉम्ब हल्ल्याची सूचना देण्यात आली. यानंतर नागरिकांना सुरक्षित ठिकाणी पोहोचण्यासाठी त्वरित सूचनांचे प्रसारण करण्यात आले. नागरिकांनी कोणताही गोंधळ अथवा धावपळ न करता शांतपणे प्रशासनाकडून देण्यात आलेल्या सूचनांचे पालन केले आणि सुरक्षितस्थळी आश्रय घेतला.



त्यानंतर, संबंधित परिसरात शोध मोहीम राबवून जखमी तसेच अडकलेल्या 40 नागरिकांना तात्काळ बाहेर काढण्यात आले आणि त्यांना प्रथमोपचार पुरविण्यात आले. इमारतीत अडकलेल्या 5 जणांची सुरक्षितपणे सुटका करण्यात आली.

या संपूर्ण कार्यवाहीदरम्यान, सर्व संबंधित यंत्रणांनी अत्यंत गांभीर्याने सहभाग घेतला आणि केंद्रीय गृह विभागाच्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन केले. मॉक ड्रिलदरम्यान कुठल्याही प्रकारची अफवा पसरली नाही आणि नागरिकांनी प्रशासनाच्या आवाहनाला उत्तम प्रतिसाद दिला.

मॉक ड्रिलच्या यशस्वी समारोपानंतर प्रांताधिकारी उर्मिला पाटील आणि तहसिलदार उमेश पाटील यांनी सांगितले की, हे मॉक ड्रिल केवळ आपत्कालीन परिस्थितीत आपली तयारी किती आहे, हे तपासण्यासाठी आयोजित करण्यात आले होते. कोणतीही खरी आपत्ती ओढवलेली नाही, याची नागरिकांनी नोंद घ्यावी. त्यांनी नागरिकांच्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले.

या महत्त्वपूर्ण मॉक ड्रिलच्या वेळी प्रांताधिकारी उर्मिला पाटील, नागरी संरक्षण दलाचे उपनियंत्रक विजय जाधव, तहसिलदार उमेश पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त मंदार जवळे, ठाणे महानगरपालिकेचे उपायुक्त दिनेश तायडे, सहायक आयुक्त सोनल काळे, ठाणे महानगरपालिका आपत्ती व्यवस्थापन अधिकारी यासीन तडवी, उपायुक्त प्रणाली घोंगे, मुख्य अग्निशमन नियंत्रण अधिकारी निलेश झलके, सहाय्यक पोलीस आयुक्त ममता डिसूझा, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ.अनिता जवंजाळ, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.पोळ, नायब तहसिलदार दिनेश पैठणकर यांच्यासह अनेक वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. एकंदरीत, "ऑपरेशन अभ्यास" हे मॉक ड्रिल ठाणे शहरात अत्यंत यशस्वीरित्या पार पडले आणि यातून आपत्कालीन परिस्थितीत प्रशासनाची आणि नागरिकांची सज्जता प्रभावी असल्याचे दिसून आले. या संपूर्ण मॉक ड्रिल मध्ये महसूल, आरोग्य, पोलीस, नागरी संरक्षण दल, होमगार्ड, ठाणे महानगरपालिका, आपत्ती व्यवस्थापन, टीडीआरएफ चे जवान, अग्निशमन दल , लोढा अमारा गृह संकुलातील अग्निशमन यंत्रणेचे जवान, सुरक्षा रक्षक आणि तेथील नागरिक या सर्वांनी आपला सहभाग नोंदविला.

## लोढा फाउंडेशन करणार शहीदांच्या मुलांचा शैक्षणिक खर्च

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई, 'ऑपरेशन सिंदूर'अंतर्गत भारतीय नागरिकांच्या संरक्षणासाठी आपल्या प्राणांचे बलिदान देणाऱ्या शहीद जवानांच्या कुटुंबियांना लोढा फाउंडेशनने मदतीचा हात पुढे केला आहे. या मोहिमेत शहीद झालेल्या प्रत्येक जवानाच्या मुलांचा शिक्षण खर्च लोढा फाउंडेशन करणार आहे. शिवाय वीर पत्नीला देणार नोकरी देखील दिली जाणार आहे, अशी घोषणा लोढा फाउंडेशनचे अध्यक्ष अभिषेक लोढा यांनी शनिवार, दि. १० मे रोजी केली.

मुंबई प्रेस क्लब येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी मंजू लोढा, विनती लोढा, मेजर (नि.) मानवेंद्र सिंह, मेजर (नि.) असिफ सैद उपस्थित होते. लोढा म्हणाले, आपले शूर जवान १४० कोटी भारतीयांच्या स्वातंत्र्य आणि प्रतिष्ठेचे रक्षण करत आहेत. त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आणि त्यांच्या शौर्य व बलिदानाला अभिवादन म्हणून, लोढा फाउंडेशन 'ऑपरेशन सिंदूर'दरम्यान शहीद झालेल्या प्रत्येक सैनिकाच्या कुटुंबाला मदत करणार आहे.लोढा फाउंडेशन शहीद जवानांच्या मुलांच्या शिक्षणाचा संपूर्ण खर्च उचलणार आहे, जो त्यांचे पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण होईपर्यंत चालू राहील. यामध्ये शिक्षण शुल्क, पुस्तके आणि वसतिगृहाचा खर्च समाविष्ट असेल. याशिवाय, 'लोढा जीनियस प्रोग्रॅम' अंतर्गत या मुलांना उच्च दर्जाच्या शैक्षणिक सुविधा व मार्गदर्शन (मेंटॉरशिप) दिले जाईल.

शहीद जवानांच्या पत्नींना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवण्यासाठी कौशल्य विकास व उद्योजकता सहाय्य दिले जाईल. तसेच, जर त्या इच्छुक असतील, तर लोढा ग्रुप व लोढा फाउंडेशनमध्ये रोजगाराच्या संधींमध्ये त्यांना प्राधान्य दिले जाईल. लोढा फाउंडेशन शहीद जवानांच्या पालकांसाठी पुढील २० वर्षांसाठी आरोग्य विम्याची व्यवस्था करेल, असेही त्यांनी सांगितले. दरम्यान, माझी आई आणि पत्नीने ही संकल्पना सुचवली असल्याचे त्यांनी नमूद केले.

**विशेष निधीची घोषणा**

भारताच्या वीर जवानांना मदतीचा हात देऊ इच्छिणाऱ्या नागरिक आणि कंपन्यांसाठी लोढा फाउंडेशनने 'ऑपरेशन सिंदूर / देशभक्त निधी' स्थापन केला आहे. या निधीमध्ये प्राप्त होणाऱ्या सर्व देणग्या ऑपरेशन सिंदूरदरम्यान शहीद झालेल्या किंवा कायमस्वरूपी अपंग झालेल्या सैनिकांच्या व नागरिकांच्या कुटुंबीयांना सहाय्य करण्यासाठी वापरल्या जातील. याव्यतिरिक्त सरकारने काही मदतीचे आवाहन केले तर प्रत्येक पातळीवर मदत करू, असे अभिषेक लोढा यांनी सांगितले.









## वाचक मनोगत

# पृथ्वीचे वाढते तापमान आणि आपण



पृथ्वीचे तापमान दिवसेंदिवस वाढत आहे याला अजून एक बाब जबाबदार आहे. 'हरितगृह परिणाम' अर्थात 'ग्रीन हाउस इफेक्ट' हे जागतिक तापमान वाढीत महत्वाची भूमिका बजावत आहे. आता 'हरितगृह परिणाम' म्हणजे नेमकं काय? याला आपण एका उदाहरणाने समजून घेऊयात... "एका गाडीच्या सर्व काचा बंद करून तिला भर उन्हात उभे करणे यामुळे गाडीच्या आतील तापमान हळूहळू वाढू लागेल आणि शेवटी तापलेल्या गाडीत माणसाला बसणे अशक्य होईल". अशाच प्रकारची स्थिती पृथ्वीसोबत मानव सध्या करत आहे.

औद्योगिकीकरणामुळे कारखाने वाढले आणि यामुळे मानवाच्या गरजा देखील वाढल्या, मात्र या सगळ्यांमधून आपण पृथ्वीला हानी पोहोचवत आहोत हे मानव विसरला आहे. कारखान्यातून मोठ्या प्रमाणात मिथेन, कार्बन आणि हानिकारक वायू यांचे उत्सर्जन होत असते आणि यामुळे पृथ्वीच्या भोवती असणारा ओझोन थर देखील नष्ट होतांना दिसत आहे. सूर्यावरून पृथ्वीवर जी हानिकारक किरण येतात त्यापासून ओझोन थर आपले संरक्षण करीत असतो मात्र कारखाने, वाहन वाढल्याने दिवसेंदिवस हरितगृह वायूंचे उत्सर्जन वाढत असल्याने हा ओझोन थर कमी होत चालला आहे आणि यामुळे पृथ्वीचे तापमान अधिकाधिक उष्ण होत आहे.

पृथ्वीच्या भोवतालच्या वातावरणाचे तापमान वाढणे म्हणजे ढोबळ मनाने जागतिक तापमान वाढ असे म्हणता येईल. मात्र याला देखील बरेच कंगोरे आहेत. आजच्या हवामानाचा विचार करता पावसाळ्यात चटके लागणारे ऊन, भर उन्हाळ्यात पाऊस तर हिवाळ्यात देखील उन्हाळ्यासारखे ऊन यालाच जागतिक तापमान वाढीचे परिणाम म्हणतात. मात्र आपण 'सोशल मीडियावर' या सगळ्या हवामान बदलाची खिल्ली उडवून मोकळे होतो. उन्हाळ्यात पावसाची मजा घेता येते म्हणून या सगळ्या समस्येकडे आपण कळत नकळतपणे दुर्लक्ष करतो.

नैसर्गिकरीत्या निर्माण झालेल्या समस्यांसाठी आपण निसर्गाला दोष द्यायला विसरत नाही. मात्र अनेक वेळा यातील काही समस्या या मानवनिर्मित समस्या असतात हे मात्र आपण सोयीस्कररित्या विसरतो. आणि याच समस्यांचे परिणाम निसर्ग काही वर्षांनी आपल्याला भोगायला लावत असतो. उदा. जागतिक तापमान वाढीमुळे अंटार्क्टिका येथील बर्फ दिवसेंदिवस वितळत आहे. तसेच १९५० पासूनच पृथ्वीचे तापमान वाढत गेले. मात्र आता आपल्याला अनियमित वातावरणातील बदल पाहायला मिळत आहे. ही समस्या मानवी जीवनाचा नाश करणारी समस्या असल्याने आपल्याला याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

वायू प्रदूषण, जल प्रदूषण, हवा प्रदूषण, कचरा प्रदूषण या सगळ्या समस्या यामुळेच व्यक्तीच्या पुढे आल्या आहेत. पृथ्वीचा ओझोन थर विरळ होत असल्याने जागतिक तापमान आणि अंटार्क्टिका प्रदेशावरील बर्फ दिवसेंदिवस वितळत आहे. जगाची ७.९ बिलियन एवढी मोठी लोकसंख्या सर्व नैसर्गिक संसाधनांना संपवीत आहे. माणूस स्वतःच्या स्वार्थासाठी निसर्गाचा जीव घेत आहे.


**मयुर साखरकर, खडवली**

# आता देशद्रोह्यांना शोधण्याची मोहीम हाती घ्यावी !

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई - ९६६४५५९७८०**

पहलगाम येथील आतंकवादी हल्ल्यानंतर भारताने प्रत्युत्तरादाखल राबवलेल्या ऑपरेशन 'सिंदूर'ने समस्त भारतीयांमधील देशप्रेम कमालीचे जागवले. हे देशप्रेम समस्त भारतीय परस्परांतील चर्चांतून आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून व्यक्त करत होते. युध्दविरामामुळे काही जण काहीसे नाराज झाले असले, तरी भारताने घेतलेला निर्णय समस्त भारतीयांच्या हिताचाच असणार यावर दृढ विश्वास असणाऱ्यांची संख्याही मोठी आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून देशप्रेमाची पोचपावती देताना बहुतांश जण भारतीय सैनिकांच्या शौर्याचे कौतुक करत होते, त्यांच्या सुरक्षेसाठी प्रार्थना करत होते आणि इतरांनाही प्रार्थना करण्याचे आवाहन करत होते. भारतीय सैन्याचे कौतुक करताना आपल्या शत्रूराष्ट्राचा करता येईल तेव्हढा तिरस्कारही केला जात होता. दहशतवादाला पोसणाऱ्या पाकिस्तानला जन्माची अद्दल घडावी अशी इच्छा प्रत्येक जण व्यक्त करत होता. अशातच भारतात राहून येथील सुख सुविधांचा लाभ घेणाऱ्या काही पाकिस्तानप्रेमींना मात्र पोटशूळ उठला आणि त्यांनी आपले पाकप्रेम सोशल मीडियावर दाखवण्याचा प्रयत्न केला. रत्नागिरीमध्ये अशाच एका पाकिस्तानप्रेमीचा शोध घेऊन नागरिकांनी त्याला चांगलाच चोप दिला. त्यापाठोपाठ पुण्यातील सिंहगड इन्स्टिट्यूटमध्ये शिकणाऱ्या खादिजा शेख या तरुणीने 'पाकिस्तान झिंदाबाद' असे लिखाण सोशल मीडियावर प्रसारित केले. तिच्या पाकप्रेमाच्या विरोधात पोलिसांत तक्रारही करण्यात आली असून सदर तरुणीला अटकही करण्यात आली आहे. सिंहगड इन्स्टिट्यूटमधूनही तिला काढून टाकण्यात आले आहे.

युद्धविराम झाला असला तरी स्वातंत्र्यानंतर आजवरचा पाकिस्तानचा इतिहास पाहता पाकिस्तानच्या कुरापत्या काही थांबणाऱ्या नाहीत. आयएमएफ कडून आठ हजार कोटी रुपयांचे कर्ज मिळाल्यावर पाकिस्तान हा पैसा आपले शस्त्रबळ वाढवण्यासाठी करेल हे निश्चित आहे. आज जरी युद्ध थांबले असले, तरी येणाऱ्या काळात त्याची कधीनाकधी ठिणगी निश्चित पडेल असे अनुमान तज्ञ मंडळींकडून वर्तवले जात आहे. त्यामुळे भविष्यात मोठे युद्ध झाल्यास भारताची अंतर्गत सुरक्षा व्यवस्था बिघडवण्याचे काम देशाचे खाऊन शत्रूचे गुणगान गाणाऱ्या मंडळींकडून केले जाण्याची दाट शक्यता आहे. सोशल मीडियावर आपले पाकिस्तानप्रेम उघडपणे व्यक्त करणाऱ्यांची संख्या अल्प आहे; मात्र छुप्या पद्धतीने ते पाकप्रेम उराशी बाळगणारे या देशाने लाखोंच्या संख्येने असतील. पहलगाम हल्ल्यानंतर पाकिस्तानी नागरिकांना देशाबाहेर काढण्याच्या मोहिमेत अनेक धक्कादायक बाबी निदर्शनास आल्या. देशातील लाखो महिलांनी पाकिस्तानी पुरुषांशी लग्न करून त्या आणि त्यांची मुले गेल्या कित्येक वर्षांपासून भारतातच राहत असल्याचे या मोहीमेतूनच समोर आले. त्यांच्या आणि त्यांच्या मुलांकडे भारताचे अधिकृत आधारकार्ड, मतदान ओळखपत्र, पॅन कार्ड आणि पासपोर्टसुद्धा आहेत. भारतातील स्वपंथीयांना डावलून पाकिस्तानी नागरिकांशी निकाह करणारया अशा महिलांचे आणि आणि त्यांच्या मुलांचे इमान कोणाशी आहे वेगळे सांगायला नको. अशांना भारतात ठेवायचे कि पाकिस्तानात पाठवायचे असा यक्षप्रश्न सुरक्षा यंत्रणांपुढेही निर्माण होतो. आजवर भारतात जे काही आतंकवादी हल्ले झाले आहेत ते सर्व पाकपुरस्कृत असले, तरी कोणतीही आतंकवादी कारवाई ही स्थानिकांच्या मदतीशिवाय पूर्ण होत नाही हे सर्वांनाच ठाऊक आहे. या आतंकवाद्यांना साहाय्य करणारे, त्यांना रसद पुरवणारे, त्यांच्या राहण्या-खाण्याची सोय करणारे भारतातील स्थानिक नागरिकच होते.



आजमितीला घुसखोरी ही भारतासमोरील एक मोठी समस्या आहे. बांगलादेशी, रोहिंग्या घुसखोरांची संख्या आज कोटींच्या घरात गेली आहे. त्यांना शोधणे आणि शोधून त्यांच्या देशात पाठवणे आज सुरक्षा यंत्रणांसमोरील मोठे आव्हान आहे कारण यातील बहुतांश लोकांकडे भारताची अधिकृत ओळखपत्रे आहेत. ही ओळखपत्रे त्यांना उपलब्ध करून देणारे, त्यांच्या निवासाची आणि रोजीरोटीची सोय करणारे देशद्रोही भारतातच राहतात. आज युद्धविराम झाला आहे. सैनिकी कारवाया थांबल्या आहेत, आता अंतर्गत सुरक्षा यंत्रणांनी कार्यान्वित होण्याची नितांत आवश्यकता आहे. शत्रूला चोख उत्तर दयायचे असेल तर देशाची अंतर्गत सशक्तताही तितकीच महत्वाची आहे. येत्या काळात देशाच्या कानाकोपऱ्यात वसणाऱ्या देशद्रोही मंडळींना शोधून त्यांच्यावर देशद्रोहा अंतर्गत कारवाई करण्याची मोहीम सरकारने हाती घ्यायला हवी. या मोहिमेत जनतेचा सहभागही अत्यंत महत्वाचा असून आपल्या आजूबाजूला अशी मंडळी वावरत असल्याचे जाणवल्यास त्याची सुरक्षा यंत्रणांना वेळीच खबर देण्याचे काम जनतेला करावे लागणार आहे. बाहेरील शत्रूशी दोन हात करण्यास आपले सैन्यबळ पूर्णतः सक्षम असल्याचे मागील आठवडाभरात आपण पहिलेच आहे आता आपल्यालाही आपली देशभक्ती दाखवण्याची संधी असून आपल्या भोवताली वावरणाऱ्या देशद्रोह्यांना वेचून पोलिसांच्या ताब्यात देऊया !

## उन्हाळी स्पेशल

# साखर अंबा



### उन्हाळी स्पेशल साखर अंबा रेसिपी

साखर अंबा ही उन्हाळ्यातील खास रेसिपी आहे. कच्चे आंबे मुबलक प्रमाणात उपलब्ध असल्याने या हंगामात ही रेसिपी अवश्य बनवावी कारण ही साखर अंबा कच्च्या आंब्यापासून बनवली जाते. या रेसिपीमध्ये तुम्हाला परिपूर्ण साखर अंबा बनवण्यासाठी अनेक टिप्स आणि ट्रिक्स मिळतील. या साखर अंबाला एक वेगळी चव देण्यासाठी आम्ही या रेसिपीमध्ये काही गरम मसाला घालत आहोत. तुम्ही ही साखर अंबा वर्षभर साठवून ठेवू शकता. मुलांना हे नक्कीच आवडेल. तुम्ही ही रेसिपी घरी ट्राय करू शकता.

नावाप्रमाणेच साखर आंबा हा साखर घालून शिजवलेला कच्चा आंबा आहे. हंगाम संपल्यानंतर आपण कच्चा आंबा जतन करू शकत नाही म्हणून हा कच्चा आंबा जतन करण्याचा एक मार्ग आहे. या रेसिपीमध्ये वापरलेले मसाले या रेसिपीला पूर्णपणे वेगळी चव देतात. आंबा जॅम, गुलंबा, आंबा पोळी, आंब्याचा लगदा इत्यादी आंबा जतन करण्याचे वेगवेगळे मार्ग आहेत. ही खूप सोपी आणि सोपी रेसिपी आहे. तुम्ही याला कच्चा आंबा जाम म्हणू शकता. मला आशा आहे की तुम्हाला ही रेसिपी आवडेल.

स्वादिष्ट साखर अंबा ही एक अतिशय सोपी आणि सोपी रेसिपी आहे. ती छान आणि तिखट लागते. उन्हाळा हा साखर अंबा बनवण्यासाठी योग्य काळ आहे कारण कच्चे आंबे भरपूर प्रमाणात उपलब्ध असतात. चपाती, पोळी किंवा फुलका सोबत खाण्यासाठी ही एक चांगली चव आहे. मुलांना ते नक्कीच आवडेल.

**पाककृती**

कच्चे आंबे धुवून सोलून घ्या. कच्चे आंबे लांब चौकोनी तुकडे करा. मध्यम आचेवर एक पॅन गरम करा आणि त्यात तूप घाला. तूप पुरेसे गरम झाल्यावर त्यात लवंगा, दालचिनी घाला आणि काही सेकंद परतून घ्या. किसलेला आंबा घाला आणि सुमारे ३-४ मिनिटे परतून घ्या. साखर घाला आणि चांगले मिसळा. मिश्रण थोडे घट्ट होईपर्यंत सर्वकाही एकत्र शिजवा, सुमारे १०-१५ मिनिटे. सुमारे ७-८ मिनिटे शिजवल्यानंतर केशर घाला आणि चांगले मिसळा. मिश्रण थोडे घट्ट झाल्यावर आणि छान ग्लेझ झाल्यावर गॅस बंद करा. साखर अंबा पूर्णपणे थंड होऊ द्या आणि साखर अंबा तयार आहे. तुम्ही साखर अंबा हवाबंद काचेच्या भांड्यात सुमारे एक वर्ष साठवू शकता.

# डिजिटल युगात माणसे मनाने एकमेकांपासून दूर

**- प्रभू गौर गोपाल दास**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई, धकाधकीच्या आणि डिजिटल युगात माणसे जरी एकमेकांच्या संपर्कात असली, तरी मनाने दूर जात असल्याचे चित्र समाजात दिसून येत आहे. मोबाईल आणि सोशल मीडियाच्या सततच्या वापरामुळे प्रत्यक्ष संवाद कमी होत चालला आहे. त्यामुळे डिजिटल युगात संवाद महत्त्वाचा आहे. धावपळीच्या जीवनात संघर्षांवर यशस्वीरित्या मात करण्यासाठी तणावमुक्त जीवनशैली आत्मसात करणे, ही काळाची गरज असल्याचे मत प्रेरणादायी वक्ते आणि लेखक प्रभू गौर गोपाल दास यांनी व्यक्त केले.

सोमवार, दि. ५ एप्रिल रोजी टेक-वारी कार्यक्रमाच्या निमित्ताने मंत्रालयात 'प्रभावी व तणावमुक्त जीवन' या विषयावर ते बोलत होते. प्रभू गौर गोपाल दास म्हणाले, सध्या जग वेगाने डिजिटल दिशेने वाटचाल करत आहे. स्मार्टफोन, कृत्रिम बुद्धिमत्ता, क्लाउड संगणक, आणि इंटरनेट यांसारखी तंत्रज्ञान आपला रोजचा भाग बनत आहेत. अशा काळात 'टेक्नोसॅव्ही' होण ही केवळ गरज नसून ती एक अनिवार्यता बनली आहे. विविध ऑनलाईन कोर्सेस, मोबाइल ॲप्स आणि ई-लर्निंग प्लॅटफॉर्म्समुळे तंत्रज्ञान शिकण आता पूर्वीपेक्षा अधिक सोप झाले आहे, असेही त्यांनी सांगितले.



## आयुष्यभर विद्यार्थी राहा

- प्रभू गौर गोपाल दास म्हणाले, शिकण ही एक प्रक्रिया आहे जी जन्मापासून मृत्यूपर्यंत सुरू असते. वय कितीही असो, नवीन कौशल्य शिकणे, भाषा आत्मसात करणे किंवा एखादा छंद जोपासणे यामुळे मेंदू अधिक कार्यक्षम राहतो. वृद्धापकाळातही अल्झायमर आणि डिमेन्शियासारखे आजार टाळण्यासाठी मेंदूला वर्कआउट देणे गरजेचे आहे. डिजिटल युगात विविध ऑनलाईन प्लॅटफॉर्म्सद्वारे हे अधिक सुलभ झाले आहे.

- दररोज थोडा वेळ स्वतःसाठी राखून ठेवा. ध्यान, वाचन, मनमोकळ्या गप्पा किंवा छंद जोपासा. नियमित व्यायाम, संतुलित आहार आणि पुरेशी झोप यांचा दिनक्रम ठेवा. या गोष्टींचा अवलंब केल्यास तणाव आणि मानसिक विकारांवर मात केली जाऊ शकते संस्कृती आणि मूल्य ही आपल्या जीवनात महत्त्वाची आहेत. तंत्रज्ञानाच्या विकासात आपण पुढे जात असताना, आपल्या परंपरा, नीतिमूल्य विसरता कामा नये. स्मार्ट, डिजिटल व भविष्यकाळासाठी सज्ज होण महत्त्वाच असलं तरी आपले संस्कार आणि मूल्य यांचा विसर पडू देऊ नका, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.




**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

आज १२ मे, आज वैशाख पौर्णिमा आजच्याच दिवशी भगवान गौतम बुद्धांचा महामाया व राजा शुद्धोदन यांचा पुत्र म्हणून लुम्बिनी वनातील शाल वृक्षाखाली जन्म झाला होता म्हणून वैशाख पौर्णिमेला बुद्ध पौर्णिमा असेही म्हणतात. ही तिथी वर्षातील सर्वात पवित्र आणि महत्वाची तिथी मानली जाते. बुद्ध पौर्णिमा आणखी तीन कारणांसाठी पवित्र मानली जाते ती म्हणजे याच दिवशी तथागत भगवान गौतम बुद्धांचा जन्म झाला होता, याच दिवशी बुद्धांना ज्ञानप्राप्ती झाली होती आणि याच दिवशी बुद्धांचे महानिर्वाण झाले होते म्हणून या पौर्णिमेला त्रिगुणी पौर्णिमा असेही म्हणतात.

बुद्ध पौर्णिमा केवळ भारतातच नाही तर जगातील १८० हुन अधिक देशात साजरी केली जाते. भारत, चीन, जपान, नेपाळ, भूतान, म्यानमार, थायलंड, श्रीलंका, मलेशिया, व्हिएतनाम, सिंगापूर, अमेरिका, कंबोडिया, इंडोनेशिया या देशात तर बुद्ध पौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. जगातील सर्व बौद्ध धर्मीय बांधव बुद्ध पौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी करतात. बुद्ध पौर्णिमेला बोध गया येथे जगभरातून बौद्ध अनुयायी येतात आणि प्रार्थना करतात. बौद्ध धर्माच्या धर्मग्रंथाचे वाचन, पठण केले जाते.

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली दिल्ली येथे २ मे १९५० रोजी भारतात पहिली सार्वजनिक बुद्ध पौर्णिमा साजरी केली गेली. २७ मे१९५३ रोजी भारत सरकारने बुद्ध पौर्णिमेला सार्वजनिक सुट्टी जाहीर केली. आज बुद्ध पौर्णिमेला सार्वजनिक स्वरूप आले आहे. भारतातील बौद्ध अनुयायी हा दिवस मोठ्या उत्साहात साजरा करतात. या दिवशी बुद्ध विहारे रंगीबेरंगी पताका, फुलांनी सजवली जातात. बौद्ध बांधव यादिवशी गोडधोडाचे जेवण करून आपले मित्र नातेवाईक यांना घरी आमंत्रण देतात. बुद्ध पौर्णिमेच्या दिवशी सर्व बौद्ध भिक्षु व बौद्ध बांधव बुद्ध विहारात एकत्र येऊन प्रार्थना करतात.


बुद्ध मूर्तीजवळ दीपप्रज्वलन करतात. बुद्धांची शिकवण अंगिकारण्याचा संकल्प करतात. बुद्धांनी सांगितलेल्या मार्गाने चालण्याचा निश्चय करतात. गौतम बुद्ध हे भारताचे सर्वोत्तम भूमिपुत्र आहेत. तथागत भगवान गौतम बुद्धांनी त्यांना मिळालेले ज्ञान समाजापर्यंत नेऊन एका वेगळ्या बदलाची पायाभरणी केली. त्याकाळात अंधश्रद्धा, कर्मकांड पाखंड यांनी उच्चांक गाठला होता. गौतम बुद्धांनी यावर प्रहार केला.

नरबळी, पशुबळी, अंधश्रद्धा, कर्मकांड यांना त्यांनी कडाडून विरोध केला. गौतम बुद्धांनी मानव कल्याणाचा उपदेश केला. लोकांमध्ये असलेल्या स्वर्ग,नरक या भंपक गोष्टींबद्दल असलेली भीती दूर करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. गौतम बुद्धांनी आपल्या अनुयायांना चार आर्यसत्य सांगितली ती चार आर्यसत्य आचरणात आणल्यास मानवाचे जीवन आनंदमय होऊ शकते. ती चार आर्य सत्य म्हणजे

१) मानवाला दुःख असते.
२)दुःखाला कारण असते.
३ ) दुःखाचे निवारण करता येते.
४) दुःख कमी करण्याचे उपाय आहेत.

मानवी जीवनातील दुःख निवारण्यासाठी बुद्धांनी आठ मार्ग सांगितले आहेत. यम, नियम, आसन, प्राणायम, प्रत्याहार, ध्यान, धारणा, समाधी. गौतम बुद्धांनी आयुष्यभर शील, समाधी आणि प्रज्ञेचा मार्ग शिकवला. त्यांनी करुणा विकसित करण्याचा आणि समता, स्वातंत्र्य व बंधुत्व यावर आधारित जीवन जगण्याचा धडा लोकांना दिला. आज बुद्ध पौर्णिमेपासून सर्वांनी शिलाचे काटेकोरपणे पालन करून आपली काया, वाचा व मनाची कृती निष्कलंक राहील असा संकल्प करावा. सर्व नागरिकांनी तथागत गौतम बुध्दांच्या मार्गाने चालावे. गौतम बुद्धांनी दाखवलेला मार्ग हाच मानव मुक्तीचा मार्ग आहे.

# उत्तन-विरार सागरी सेतूच्या पहिल्या टप्प्याला गती




दै. ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी

मुंबई, उत्तन-विरार सागरी सेतू या परिवर्तन घडविणाऱ्या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याची अंमलबजावणी करण्याला मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरणामार्फत वेग देण्यात आला आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामुळे उत्तर मुंबई महानगर क्षेत्राचा सर्वांगीण लाभ होणार आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या १५९व्या प्राधिकरण बैठकीत सविस्तर आढावा घेतल्यानंतर, सुधारित टप्पा-१ प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली. १५९व्या प्राधिकरण बैठकीत तांत्रिक आणि आर्थिक पैलूंचा सविस्तर आढावा घेण्यात आला. त्यानंतर ₹८७,४२७.१७ कोटी इतक्या सुधारित प्रकल्प खर्चाला मंजुरी देण्यात आली.


सुरुवातीला महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या (एमएसआरडीसी) अखत्यारीत वर्सोवा-विरार सागरी सेतू (व्हीव्हीएसएल) म्हणून या प्रकल्पाची संकल्पना मांडण्यात आली होती. मात्र, ऑक्टोबर, २०२२ मध्ये झालेल्या १५३व्या प्राधिकरण बैठकीत हा प्रकल्प एमएमआरडीएकडे हस्तांतरित करण्यात आला.

त्यानंतर फेब्रुवारी, २०२४ मध्ये दोन अंमलबजावणी योग्य टप्प्यांमध्ये प्रकल्पाची रचना विभागण्यात आली. यातील टप्पा-१च्या (उत्तन ते विरार) अंमलबजावणीसाठी तातडीने मंजुरी देण्यात आली असून टप्पा-२बाबत (विरार ते पालघर) सध्या व्यवहार्यता अभ्यास करण्यात येत आहे. हा भाग मुंबई महानगरपालिकेच्या उत्तर सागरी किनारा मार्ग प्रकल्पात समाविष्ट असल्यामुळे तो सध्याच्या संरेखनातून वगळण्यात आला आहे.

"महाराष्ट्राच्या पायाभूत विकासाचा विचार करता हा प्रकल्प ही एक मोठी झेप आहे. सर्वांसाठी अधिक चांगली कनेक्टिव्हिटी निर्माण करण्याचा, आर्थिक प्रगतीला चालना देण्याचा आणि मुंबईत पर्यावरणपूरक विकास करण्याचा आमचा निर्धार या प्रकल्पातून दिसून येतो. उत्तन-विरार सागरी सेतूमुळे या भागासाठी अधिक उज्वल आणि सर्वांशी जोडलेल्या भविष्यासाठीचा मार्ग तयार झाला आहे."
**- देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री**

"उत्तन-विरार सागरी सेतू (यूव्हीएसएल) जोडणीद्वारे मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे आणि पालघर हे महत्त्वाचे जिल्हे पूर्वीपेक्षा अधिक चांगल्या प्रकारे जोडले जाणार आहेत. या प्रकल्पामुळे प्रवास सुकर होणारच आहे, शिवाय आर्थिक संधी वाढतील, आपत्कालीन सेवा अधिक सुलभपणे पोहोचू शकतील आणि संपूर्ण भाग परस्परांच्या अधिक जवळ येईल आणि 'वन एमएमआर, वन ग्रोथ स्टोरी' (एक एमएमआर, एक यशोगाथा) हे व्हिजन या प्रकल्पातून साकार होत आहे."
**एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री व एमएमआरडीए, अध्यक्ष**

"उत्तन-विरार सागरी सेतूच्या (यूव्हीएसएल) माध्यमातून आम्ही कमी करण्यासोबतच आयुष्यही बदलत आहोत. विरार आणि मुंबई काही मिनिटांत जोडणाऱ्या या महत्त्वपूर्ण कॉरिडॉरमुळे दैनंदिन प्रवास अधिक सुलभ होईल, कामाच्या ठिकाणी पोहोचण्यास वेळ कमी लागेल आणि वैद्यकीय आणीबाणीच्या प्रसंगी वेळेत वैद्यकीय सुविधेपर्यंत पोहोचता येईल. अधिक समावेशक, अधिक जोडलेला आणि अधिक सक्षम असा मुंबई महानगर प्रदेश घडविण्याच्या दिशेने हा प्रकल्प ही एक मोठी झेप आहे."
**- डॉ. संजय मुखर्जी, महानगर आयुक्त, एमएमआरडीए**



**सोमवार**
**१२ मे २०२५**

**मेष**
कामाच्या ठिकाणी तुमचे काम चांगले होईल. कामात मदत लागेल, चांगल्या मित्राचा सल्ला मिळेल.

**वृषभ**
महत्त्वाची कामे सकारात्मक दृष्टिकोनाने पूर्ण करता येतील. दिवस तुमच्यासाठी चांगला जाणार

**मिथुन**
व्यावसायिक बाबतीत आपल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी कठोर परिश्रम करावे लागतील.

**कर्क**
विरोधक तुमचे नुकसान करण्याचा अयशस्वी प्रयत्न करतील. कौटुंबिक वातावरण आनंददायी राहील.

**सिंह**
या राशीचे लोक जे सरकारी सेवेत आहेत त्यांना काही उत्कृष्ट असाइनमेंट मिळू शकते.

**कन्या**
आज तुमचे कोणतेही नियोजित काम पूर्ण होईल. दिवस तुमच्यासाठी चांगला जाणार आहे.

**तूळ**
काम करण्याच्या नवीन पद्धतीचा विचार कराल, काम वेळेवर आणि सहज पूर्ण होण्यास मदत होईल.

**वृश्चिक**
विद्यार्थ्यांसाठी दिवस चांगला जाणार आहे. दिवस तुमच्यासाठी अनुकूल असणार आहे.

**धनु**
कामाला नवीन स्वरूप देण्यासाठी सर्जनशील क्रियाकलापांमध्ये देखील रस असेल.

**मकर**
विद्यार्थ्यांना स्पर्धेशी संबंधित कार्यात यश मिळेल. नवीन कामाचा विचार करण्याची संधी मिळू शकते.

**कुम्भ**
दिवस तुमच्यासाठी चांगला परिणाम देईल. विद्यार्थ्यांना यश मिळण्याची शक्यता आहे.

**मीन**
अभ्यासात अजून मेहनत करावी लागेल. कुटुंबातील सदस्यांसोबत चांगला वेळ घालवायला मिळेल.

# पावसाळ्यापूर्वी ठाणे स्थानकातील सर्व विकासकामे तातडीने पूर्ण करा

## खासदार नरेश म्हस्के यांच्या रेल्वेच्या अधिकाऱ्यांना सूचना

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ठाणे रेल्वे स्थानकाचा नुतनीकरणाच्या माध्यमातून कायापालट होत आहे. फलाटांवर नव्याने छतांची उभारणी, पंखे, वाढीव आरक्षण खिडक्या, वातानुकूलीत प्रतीक्षा कक्ष उभारण्यात येत आहे. नियमित स्वच्छतेवर भर द्या, युद्धजन्य परिस्थितीमुळे प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी दक्ष रहा, पावसाळ्यापूर्वी सर्व विकासकामे तातडीने पूर्ण करा, अशा महत्वपूर्ण सूचना आज ठाणे लोकसभेचे खासदार नरेश म्हस्के यांनी रेल्वेच्या अधिकाऱ्यांना केल्या.

ठाणे रेल्वे स्थानकात सुरु असलेल्या विकासकामांचा आढावा तसेच प्रवाशांच्या समस्या जाणून घेण्यासाठी आज ठाणे लोकसभेचे खासदार नरेश म्हस्के यांनी रेल्वे अधिकाऱ्यांसमवेत पाहणी दौरा केला. या दौऱ्यानंतर बैठक घेण्यात आली. गेल्या वर्षभरापासून वेळोवेळी केलेल्या सूचनांची योग्य अमलबजावणी रेल्वे अधिकाऱ्यांनी केली आहे. आज प्रत्यक्षात सर्व बदल दिसत असून विकासकामांबाबत खासदार नरेश म्हस्के यांनी समाधान व्यक्त करत अधिकाऱ्यांचे कौतुक केले.



ठाणे रेल्वे स्थानकातून दररोज आठ लाख प्रवासी प्रवास करत आहेत. रेल्वे प्रवाशांच्या समस्या, विकासकामे, प्रस्तावित कामांबाबत मी निवडून आल्यापासून डीआरएम, डीएम यांच्याशी सातत्याने माझा पाठपुरावा सुरु आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत बैठकाही झाल्या आहेत. आता नव्याने वातानुकूलीत प्रतिक्षा कक्ष उभारला जात असून येत्या जुलै महिन्यात त्याचे लोकर्पण अपेक्षित आहे. आठ एक्सिलेटर्स प्रवाशांच्या सेवेत असून दोन एक्सिलेटर्स लवकरच प्रवाशांच्या सेवेत दाखल होणार असल्याची माहिती खासदार नरेश म्हस्के यांनी यावेळी माध्यमांना दिली.

ठाणे रेल्वे स्थानकातील फलाटांवरील नव्याने छताचे पत्रे बदलण्याचे काम वेगाने सुरु आहे. एका रेल्वे पादचारी पूलाचे काम सुरु असून लवकरच ते मार्गी लागणार आहे. उन्हाळ्याची सुट्टी पडली असून मोठ्या संख्येने प्रवासी बाहेरगावी जाणार असल्याने तातडीने दोन वाढीव आरक्षण खिडक्या सुरु करण्यात येणार आहेत. स्वच्छतागृहांची नियमित स्वच्छता करणे, प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी रेल्वे पोलीस सज्ज असल्याची माहिती खासदार नरेश म्हस्के यांनी दिली.

ठाणे आणि मुलंड रेल्वे स्थानकादरम्यान नवीन स्थानकाची उभारणी करण्यात येणार आहे. कायदेशीर अडचण आल्याने त्याचे काम खोळंबले आहे. मात्र त्यातून तोडगा लवकरच निघणार असून नवीन रेल्वे स्थानकाची उभारणी झाल्यावर ठाणे रेल्वे स्थानकावरचा मोठा ताण कमी होणार आहे. ठाणे रेल्वे स्थानकातील प्रवाशांची गर्दी पाहाता मोजून दोन ते तीन तास विकासकामे करायला अधिकाऱ्यांना वेळ मिळतो. अतिशय कमी वेळेत रेल्वेचे अधिकारी काम करत असल्याबद्दल यावेळी खासदार नरेश म्हस्के यांनी त्यांचे कौतुक केले.

पाहणी दौऱ्यात मध्य रेल्वेचे मंडल मुख्य अभियंता विलास पैठणकर, रेल्वे पोलीस दलाचे सहाय्यक आयुक्त अतुल क्षिरसागर, स्टेशन प्रबंधक केशव तावडे, सहाय्यक वाणिज्य प्रबंधक एम. एल. मिना, शिवसेना ठाणे शहर प्रमुख हेमंत पवार, शहर संघटक भास्कर पाटील, रमाकांत पाटील, विभागप्रमुख कमलेश चव्हाण, अमित जयस्वाल, किरण नाकती, निखिल बुडजडे, प्रशांत पाटील, संतोष बोडके, प्रकाश पायरे, संजिव कुलकर्णी, वैभव ठाकूर, आनंद जयस्वाल, रोहित गायकवाड, प्रीतम राजपूत, प्रकाश खांडेकर, विकास पाटील, सुशांत मोरे, अशोक कदम, रमाकांत चौधरी, मधुकर गिजे, महिला उपजिल्हाप्रमुख वंदना डोंगरे, विभागप्रमुख रिना मुदलीयार, यमुना म्हात्रे, प्राची मोरे आणि शिवसैनिक उपस्थित होते

# सहलीस गेलेल्या बिर्ला स्कुलच्या शिक्षिकेचा अपघाती मृत्यू



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण:** कल्याणमधील नामवंत बी. के. बिर्ला शाळेतील विद्यार्थी, शिक्षिकांसोबत सहलीस गेलेल्या एका शिक्षिकेचा तेथे अपघाती मृत्यू झाला आहे. या महिला शिक्षिकेच्या मृत्यूबद्दल विद्यार्थी, पालकांमध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे. सोमवारी या महिला शिक्षिकेचे पार्थिव कल्याण येथे आणले जाणार आहे. विश्वसनीय सुत्रांकडून मिळालेली माहिती, अशी की कल्याणमधील बी. के. बिर्ला शाळेतील शिक्षक, १६ विद्यार्थ्यांची सहल मौजमजेसाठी बाली येथे गेली होती.

एका पर्यटन कंपनीच्या माध्यमातून शाळेने या सहलीचे नियोजन केले होते. श्वेता पुष्कर पाठक असे अपघातात मरण पावलेल्या शिक्षिकेचे नाव आहे. या सहली सोबत बी. के. बिला शाळेच्या मुख्याध्यापिका रंजना जांग्रा आणि इतर शिक्षक, श्वेता पाठक यांचे पतीही होते. शनिवार रात्री बी. के. बिर्ला शाळेतील एका शिक्षिकेचे बाली येथे मृत्यू झाल्याची माहिती कल्याणमध्ये धडकली. स्थानिक पोलीस, शिक्षण संस्था याविषयी अनभिज्ञ होत्या. रात्री उशिरा श्वेता पाठक यांचा बाली येथे अपघाती मृत्यू झाल्याच्या माहितीला दुजोरा मिळाला. श्वेता पाठक या बी. के. बिर्ला शाळेतील समर्पित भावनेच्या आदर्श शिक्षक होत्या. हरहुन्नरी स्वभावाच्या श्वेता पाठक या उपक्रमशील शिक्षिका म्हणून शाळेत ओळखल्या जात होत्या. शालेय अभ्यासक्रमा बरोबर विद्यार्थ्यांना अवांतर माहिती देऊन त्यांची घडण झाली पाहिजे यासाठी त्यांचे सतत प्रयत्न असत. विद्यार्थी, पालक यांच्यामधील महत्वाचा दुवा म्हणून त्या शाळेत काम करत होत्या. उत्तम प्रशिक्षक शिक्षक म्हणून शाळेत त्यांची ओळख होती. शाळेतील प्रत्येक विद्यार्थी आपल्या क्षमतेप्रमाणे विकसित झाला पाहिजे यासाठी त्या शाळेत विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम हाती घेत, असे शाळेतील त्यांच्या समर्थक कर्मचाऱ्यांनी सांगितले. श्वेता पाठक यांच्या अचानक जाण्याने शाळा व्यवस्थापन, पालक, विद्यार्थी यांना धक्का बसला आहे. विदेशात शालेय सहली नेताना सीबीएससी शाळेची नियमावली आहे. या नियमावलीप्रमाणे विदेशात पर्यटनासाठी विद्यार्थ्यांना घेऊन जात असताना, त्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देण्यात यावे. स्थानिक जिल्हा प्रशासन, स्थानिक यंत्रणेला यासंदर्भात अवगत करण्यात यावे. या नियमावलीचे पालन शाळेने केले होते की नाही याविषयी काही समजू शकले नाही.

शाळा व्यवस्थापनाकडून यासंदर्भात प्रतिसाद मिळत नाही. शाळेचे विद्यार्थी शिक्षकांबरोबर पर्यटन कंपनीच्या साहाय्याने बाली येथे गेले आहेत. तेथे एका शिक्षिकेचा मृत्यू झाला आहे. ही माहिती शाळेच्या संकेतस्थळावर देण्यात आली आहे. एवढीच माहिती व्यवस्थापनाकडून देण्यात येत आहे.

# सहकार क्षेत्राच्या निवडणुका झाल्या डोईजड

## भात गिरणीची निवडणूक बिनविरोध करा ; संचालकांचे आवाहन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर :** तालुक्यातील एक नावाजलेली असलेल्या किसान सहकारी भात गिरणीच्या संचालक मंडळाचा निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला असून या निवडणूक प्रक्रियेसाठी लाखो रुपये सहकार विभागाला अनाठायी भरावे लागणार असल्याने विद्यमान संचालक मंडळाने एक सकारात्मक दृष्टीकोन ठेऊन सदर निवडणूक बिनविरोध करण्याचे आवाहन केले आहे.यासाठी सर्व मतदार व अर्ज दाखल केलेले उमेदवार यांची आज सोमवारी दुपारी ३ वाजता सहविचार सभा लेनाड (खु) येथील संस्थेच्या सभागृहात आयोजित करण्यात आली असल्याची माहिती पदाधिकाऱ्यांनी दिली.

शहापूर तालुक्यातील एक नावाजलेली असलेल्या किसान सहकारी भात गिरणी लि. लेनाड (खु) या सहकारी संस्थेच्या निवडणुकीत ४मतदार संघ असून २१ जागांकरिता तब्बल ८२ अर्ज दाखल झाले आहेत.दरम्यान मागील वर्षापासून संचालक मंडळाने निवडणूक प्रक्रियेसाठी संस्थेला ३ लाख ४० हजार रुपये सहकार विभागाला भरावे लागणार असल्याचे पत्रकात म्हटले आहे.किंबहुना आत्ताच झालेल्या विधानसभा व लोकसभा निवडणुकीत अशिक्षित मतदारांना आर्थिक अमिष दाखवून मत विकत घेण्याचे प्रकार सर्वश्रुत असून यामध्ये सुशिक्षित मतदार खूपच अग्रेसर पहावयास मिळाला. त्यामुळे या सहकारी भात गिरणीची निवडणूक झाल्यास उमेदवारांना अनावश्यक लाखो रुपये खर्च करावे लागणार आहेत.पर्यायाने मानसिक त्रास, पैसा व वेळ यांचा अपव्यय होईल शिवाय संस्थेच्या देखील लाखो रुपयांना चुना लागणार आहे.या संस्थेची परिस्थिती अतिशय गंभीर असली तरी सध्या असलेले होतकरू संचालक मंडळाच्या निरपेक्ष सहकार्य व जाणकार शेतकरी यांच्या मार्गदर्शनाने आजही ही संस्था उभी आहे. वर्षातील फक्त तीन ते चार महिने भात भरडाई आणि खत विक्रीतून होणाऱ्या उत्पन्नावर या संस्थेचा गाडा हाकला जातो.वार्षिक दोन ते अडीच लाख रुपये म्हणजे पाच वर्षात अंदाजे दहा लाखांपर्यंत संस्थेला उत्पन्न मिळत असून निवडणूकीसाठी यामधील काही रक्कम सहकार विभागाला गेल्यास संस्थेकडे तुटपुंजी रक्कम शिल्लक उरत असल्याचे संचालक मंडळाचे म्हणणे आहे.

### अन्यथा लागणार अखेरची घरघर

सहकारातून समृध्दीचे स्वप्न पाहणाऱ्या शहापूर तालुक्यातील लेनाड खुर्द येथील किसान सहकारी भात गिरणी सध्यातरी थोडीफार तग धरून आहे.ही सहकारी संस्था उभारतांना दानशूर जागा मालक व तत्कालिन नेते मंडळीनी मोठे परिश्रम घेतले.मात्र काही काळानंतर सहकाराची चळवळ मंदावली आणि तालुक्यातील या सहकारी भातगिरणीवर अविश्वासाचे वारे घोंगावू लागले.शेतकऱ्यांनी आपल्या जिवाचे रान करून ही भात गिरणी उभी करुन तीला जिवंत ठेवण्याचा प्रयत्न केला.किसान सहकारी भात गिरणी ही तालुक्यातील उत्कृष्ट संस्था आहे. सभासद,शेतकरी व नागरिकांचा या संस्थेवर मोठा विश्वास आहे. संचालक पदासाठी इच्छुक कार्यकर्त्यांची संख्या मोठी असून सर्व उमेदवार तोलामोलाचे आहेत.असे असले तरी संस्थेची आर्थिक बाजू लक्षात घेता सदर निवडणूक बिनविरोध व्हावी असे मत असंख्य जाणकारांनी प्रस्तुत प्रतिनिधिशी बोलतांना व्यक्त केले.

### तरच सहकार टिकेल...

सध्या सहकार क्षेत्रात नैतिक मूल्यांचा -हास होतांना दिसत आहे.त्यामुळे सहकारी संस्थेतील प्रत्येक सदस्याने वैयक्तिकरित्या जबाबदार असले पाहिजे असे सहकार तज्ञाचे मत आहे.सहकार विभागाचे अधिकारी देखील येथील भ्रष्टाचाराला खतपाणी घालत असल्याची असंख्य आरोप होतांना दिसत आहेत. तसेच कोणत्याही संस्थेतील कर्मचारीसुद्धा प्रथम स्वतःशी प्रामाणिक आणि शिस्तबद्ध असायला हवा.आयसीएने सांगितल्याप्रमाणे स्व-मदत, लोकशाही नियंत्रण, सामानता, सहकार्य,शिक्षण आणि माहिती, स्वायत्तता व समुदायाची चिंता ही सात तत्वे सहकारी संस्थेचे आधारस्तंभ आहेत आणि त्यातूनच सहकारी चळवळ यशस्वी होईल अन्यथा सहकार क्षेत्र हे भ्रष्टाचारी लोकांसाठी चरण्याचे कुरण होईल.

# सिद्धेश्वर तलाव प्रदूषित झाल्याने माशांचा मृत्यू

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ठाणे महापालिकेच्या मुख्यालयापासून काही मीटर अंतरावर असलेल्या सिद्धेश्वर तलावातील ५० हून अधिक माशांचा मृत्यू झाला आहे. परिसरातील सांडपाणी तलावात जाऊन सिद्धेश्वर तलाव प्रदूषित झाले आहे. काही दिवसांपूर्वीच अशाचप्रकारे माशांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर पुन्हा एकदा हा प्रकार घडल्याने सिद्धेश्वर तलावातील जल प्रदूषणाचा मुद्दा ऐरणीवर आला आहे.



पाचपाखाडी येथे ठाणे महापालिकेचे मुख्यालय आहे. या मुख्यालयापासून काही मीटर अंतरावर असलेल्या सिद्धेश्वर तलावात शनिवारी रात्री मृत मासे आढळून आले. यापूर्वी २४ एप्रिलला माशांचा मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली होती. त्यानंतर ठाणे महापालिकेने येथील सांडपाणी रोखण्यासाठी उपाययोजना सुरु केल्याचा दावा केला होता. परंतु अवघ्या काही दिवसांतच पुन्हा एकदा मृत माशांचा खच तलावात आढळून आल्याने महापालिकेच्या कारभाराविषयी प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. परिसरातील सांडपाणी थेट तलावात सोडले जात असल्याने हा तलाव प्रदूषित झाल्याचे समोर आले. याबाबत ठाणे महापालिकेच्या मुख्य पर्यावरण अधिकारी मनीषा प्रधान यांना याबाबत विचारले असता, तलावात सोडले जाणाऱ्या सांडपाण्याचे सर्वेक्षण करण्यात आले असून ते सांडपाणी बंद करण्याची प्रक्रिया सुरू केली होती. परिसरात ४०० मीटरची मलनि:स्सारण वाहिनी टाकण्याचे काम सुरु आहे. त्यासाठीचे सर्वेक्षण देखील झाले आहे. लवकरच या कामास सुरुवात होणार आहे. तसेच तलावातील प्रदूषण कमी करण्यासाठी या तलावात दोन वायुवीजन यंत्रणा आहेत. त्याठिकाणी आणखी चार वायुवीजन यंत्रणा बसविल्या जाणार असल्याचा दावा त्यांनी केला.



# आठवणींच्या हिंदोळ्याचे सहाव्या ई-पुस्तकाचं प्रकाशन


दै. ठाणे जीवनदीप वार्ता

निवृत्तीनंतर, विशेषतः करोना काळात, मित्रमंडळी, परिचित, नातेवाईकांमध्ये आयुष्याप्रती वाढत चाललेली अनिश्चितता, दाटलेली निराशा संपावी तसेच नकारात्मकतेचं रूपांतर सकारात्मकतेत व्हावं म्हणून श्री विष्णु यादव यांनी आपल्या रिझर्व्ह बँकेतील निवृत्तीनंतर जे काही लिहिले ते त्यांनी " हिंदोळा आठवणींचा " या शीर्षकाखाली आजवर पाच ई-लेखसंग्रह प्रकाशित केले. दिनांक 9 मे 2025 रोजी आपल्या दिवंगत मातोश्रींच्या चरणी अर्पण केलेल्या "हिंदोळा आठवणींचा – पुष्प सहावे" ह्या त्यांच्या ई-पुस्तकाचं प्रकाशन त्यांच्या ठाण्यातील घरी त्यांचे मित्र व नाबार्ड मधील निवृत्त अधिकारी श्री आदिराज साबळे यांच्या हस्ते मोजक्या सुहृदांच्या उपस्थितीत झाले.

# विवाह सोहळ्यातून पर्यावरणपूरक विचारांची रुजवण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** येथील रहिवासी भाग्यश्री आरोटे आणि डुंबरे पाटील यांचे चिरंजीव सुशांत यांच्या विवाह समारंभात, सुशील आरोटे यांच्या पर्यावरणपूरक आणि सर्जनशील संकल्पनेतून एक आगळीवेगळी, निसर्गप्रेमाचा संदेश देणारी संपूर्ण संकल्पना साकारण्यात आली. या समारंभासाठी झेंडूच्या बीजांनी युक्त लाकडामुक्त कागदावर तयार केलेली खास लग्नपत्रिका पाहुण्यांना वितरित करण्यात आली. ही पत्रिका फेकण्याऐवजी कुंडीत लावता येईल आणि त्यातून झेंडूचे फूलझाड उगवेल, असा सकारात्मक आणि कृतीशील संदेश समाजापर्यंत पोहोचवण्यात आला. अक्षता देखील पारंपरिक पद्धतीऐवजी तुळशीच्या बीजांनी समृद्ध असलेल्या 'सिड पेपर'मध्ये पॅक करण्यात आली होती. ही अक्षता मातीमध्ये पेरल्यास तुळशीचे रोप उगवते. 'फेकू नका, लावा' आणि 'झाडे लावा, झाडे जगवा' हेच या संकल्पनेमागील मुख्य ध्येय.




**आरोटे – डुंबरे पाटील कुटुंबियांचा पर्यावरणपूरक लग्न सोहळा**

———

**झेंडूच्या बीजांनी युक्त लग्नपत्रिका, तर तुळशीच्या बीजांनी समृद्ध असलेल्या अक्षता**

विवाह समारंभात आलेल्या सर्व पाहुण्यांना परतफेडीच्या भेटवस्तू म्हणून २४ तास ऑक्सिजन निर्माण करणारे आणि पर्यावरण शुद्ध करणारे "स्नेक प्लांट" रोपे वितरित करण्यात आली. प्लास्टिकच्या पिशव्यांऐवजी कापडी पिशव्यांचा वापर करण्यात आला आणि 'प्रकृतीविना जीवन अशक्य आहे' हा संदेश समाजासमोर प्रभावीपणे मांडण्यात आला.

या संकल्पनेविषयी बोलताना, आरोटे कुटुंबातील माता प्रमिला आरोटे यांनी सांगितले की, "निसर्ग संवर्धन हे प्रत्येकाच्या जीवनाचा एक भाग व्हायला हवा. समाजात सकारात्मक बदल घडवण्यासाठी अशा कृतींची अत्यंत गरज आहे." सुशील आरोटे यांच्या पत्नी, आरोटे कुटुंबातील सुशिक्षित आणि पर्यावरणप्रेमी नीता आरोटे यांनी यावेळी म्हटले, "निसर्गाचा समतोल राखणे व पर्यावरणाचे रक्षण करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. विवाहासारख्या मंगलप्रसंगी पर्यावरणपूरक विचार रुजवणे ही आमच्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे. प्रत्येकाने एक झाड लावावे, त्याचे संगोपन करावे आणि हरितक्रांतीत आपला मोलाचा वाटा द्यावा, हीच आरोटे आणि डुंबरे कुटुंबाची पवित्र भावना आहे."

ही संपूर्ण संकल्पना – सजीव पत्रिका, सिड पेपर अक्षता, रोपांचे वाटप – महाराष्ट्रभर एक दीपस्तंभ ठरेल आणि भावी पिढ्यांना प्रेरणा देईल, असा ठाम विश्वास अनेक मान्यवरांनी व्यक्त केला.

# ठाण्यातील स्पा सेंटरमध्ये अश्लील कृत्ये

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ठाण्यातील उच्चभ्रू गृहसंकुलाच्या आवारातील एका स्पा सेंटरमध्ये अश्लील कृत्ये सुरु असल्याचा प्रकार समोर आला आहे. ठाणे गुन्हे अन्वेषण शाखेच्या अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्षाने कारवाई करून चार जणाविरोधात राबोडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. चारही जणांना पोलिसांनी अटक केली आहे. माजिवडा येथील साकेत रोड परिसरात गृहसंकुल आहेत. येथील गृहसंकुलाच्या आवारात एक स्पा सेंटर आहे. या स्पा सेंटरमध्ये गैरप्रकार सुरु असल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्षाच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक चेतना चौधरी यांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे, चौधरी यांनी पथके नेमली. कारवाई दरम्यान या ठिकाणी स्पा च्या नावाखाली अश्लील कृत्य सुरु असल्याचे समोर आले. या प्रकरणी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्षाने तक्रार दाखल केली. या तक्रारीच्या आधारे राबोडी पोलीस ठाण्यात चौघाविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# डोंबिवलीत ग्राहकाकडून हॉटेल मालकाला बेदम मारहाण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली** - डोंबिवली पश्चिमेतील कुंभारखाणपाडा भागात राहत असलेल्या एका हॉटेलच्या मालकाला गुरुवारी रात्री एका ग्राहकाने रागाच्या भरात बांबुने बेदम मारहाण केली आहे. या मारहाणीत हॉटेल मालकाच्या डोळयाला गंभीर दुखापत झाली आहे. हॉटेल मालकाने या मारहाण प्रकरणी ग्राहका विरुध्द तक्रार विष्णुनगर पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे. योगित विश्वनाथ शेट्टी (३६) असे हॉटेल मालकाचे नाव आहे. ते डोंबिवली पश्चिमेतील कुंभारखाणपाडा भागात कुटुंबीयांसह राहतात. त्यांचे डोंबिवलीत तुलसा नावाने हॉटेल आहे. शेट्टी यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी ग्राहक दिलीप भोईर यांच्या विरुध्द गुन्हा दाखल करून घेतला आहे.

विष्णुनगर पोलीस ठाण्यातील तक्रारीत हॉटेल मालक योगित शेट्टी यांनी म्हटले आहे, की गुरुवारी रात्री साडे नऊ वाजण्याच्या दरम्यान आपल्या तुलसा हॉटेलमध्ये दिलीप भोईर आणि त्यांचे मित्र भोजनासाठी आले होते.

भोजन सुरू असताना दिलीप भोईर यांच्या मित्राला लघुशंका आली. लघुशंकेसाठी ग्राहक भोईर यांचा मित्र हॉटेलमधील स्वच्छतागृहात गेला. पण तेथे घाण असल्याने त्यांनी याबद्दल नाराजी व्यक्त केली. आणि तेथे लघुशंका न करता ते माघारी आले. हॉटेलमध्ये न थांबता ते बाहेर लघुशंका करण्यासाठी निघून गेले. याविषयी हॉटेल मालकाने नाराजी व्यक्त केली.

या विषयावरून हॉटेल मालक योगित शेट्टी यांनी ग्राहक दिलीप भोईर यांना उद्देशून म्हणाले, 'काय तुमच्या मित्राला लघुशंका कोठे करावी हे समजत नाही का'. त्यानंतर हॉटेल मालक शेट्टी आणि भोईर यांच्यात वाद झाला. शाब्दिक बोलाचालीचे रूपांतर भांडणात झाले. यावेळी भोईर यांनी हॉटेल बाहेर उभ्या असलेल्या आपल्या स्विफ्ट वाहनातून लाकडी बांबू काढला. ते घेऊन ते हॉटेलमध्ये आले. त्यांनी आपल्या आपल्या उजव्या डोळ्याच्यावर बांबुने फटका मारल्याने डोळयातून रक्तस्त्राव सुरू झाला, असे हॉटेल मालक शेट्टी यांनी तक्रारीत म्हटले आहे. साहाय्यक पोलीस उपनिरीक्षक सोळंके याप्रकरणाचा तपास करत आहेत.







दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

https://x.com/@Jeevandeepvarta
https://www.facebook.com/jeevandeepnews
https://www.instagram.com/thane_jeevandeep
https://jeevandeepvarta.com

दैनिक ठाणे
# जीवनदीप वार्ता
ठाणे ■ सोमवार ■ १२ मे २०२५
४
jeevandeepvartanews2020@gmail.com

## मातृदिनानिमित्त आसरा फाउंडेशनचा आदिवासी मातांसाठी कार्यक्रम

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** आसरा फाउंडेशनच्या वतीने शहापुर येथे मातृदिनाचे औचित्य साधून येथील आदिवासी पाड्यातील महिलांसाठी एका विशेष मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात आदिवासी महिलांना त्यांच्या पारंपरिक कला आणि कौशल्यांचे संवर्धन करण्यासोबतच जीवनातील आव्हानांचा सक्षमपणे सामना कसा करावा, याबद्दल संस्थेचे अध्यक्ष मोहन शिरकर यांनी महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या केंद्रस्थानी महिला सक्षमीकरण हा विषय होता. शिरकर यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "आदिवासी समाजातील माता जर आज खऱ्या अर्थाने सक्षम झाल्या, तर त्या केवळ त्यांच्या कुटुंबालाच नव्हे, तर येणाऱ्या पिढीलाही योग्य दिशा दाखवू शकतील.

त्यामुळे महिलांचे शिक्षण आणि आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होणे अत्यंत आवश्यक आहे." त्यांनी महिलांना त्यांच्यातील उपजत कलागुणांना व्यावसायिक दृष्टिकोन देत स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण करण्याचे आवाहन केले.

या विशेष कार्यक्रमाला अंगणवाडी शिक्षिका जयश्री चौधरी, आशा कार्यकर्त्या दिपाली चौधरी, आशा सुपरवायजर संध्या पाटेकर, आसरा फाउंडेशनच्या सदस्या महानंदा शिरकर आणि शबाना पटेल यांच्यासह परिसरातील अनेक महिला उपस्थित होत्या.

## धडक कारवाई करत सहा. आयुक्त हेमा मुंबरकर यांनी फेरीवाल्यांना सुनावलं

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●



**डोंबिवली :** डोंबिवली पूर्वेकडील 'फ' प्रभाग क्षेत्र हद्दीतील स्टेशनबाहेरील फेरीवाल्यांवर नेहमीप्रमाणे कारवाई सुरु होती. फेरीवाल्यांवर सातत्याने कारवाई सुरु असते. शुक्रवार 9 तारखेला सायंकाळी सहायक आयुक्त हेमा मुंबरकर यांनी पथकासह कारवाई करताना 'स्टेशनबाहेरील रस्तावर तुमचा सातबारा नाही... कारवाई तर होणारच 'अशा शब्दात सुनावले.कैलास लस्सी ते स्टेशनबाहेरील परिसरात कारवाई सुरु असतानाही दुकानबाहेर फेरीवाले बसलेले पाहून दुकानदारांनी फेरीवाल्यांना बसू देऊ नये असे आवाहन केले. स्टेशनबाहेरील परिसर फेरीवाला मुक्त करण्याकरता पालिका प्रशासनाकडून सातत्याने कारवाई सुरु आहे. डोंबिवली पूर्वेकडील स्टेशन बाहेरील परिसरातील फेरीवाल्यांवर 'फ' प्रभाग क्षेत्र सहायक आयुक्त हेमा मुंबर कर यांनी फेरीवाला अतिक्रमण विभागाचे पथकप्रमुख व कर्मचारी यांनी फेरीवाल्यांवर कारवाई केली.'स्टेशनबाहेरील रस्तावर तुमचा सातबारा नाही... कारवाई तर होणारच' असे फेरीवाल्यांना सुनावले. अगदी अर्धा रस्तावर अतिक्रमण केल्यासारखे फेरीवाल्यांनी जागेवर भाजी,फळे, खेळणी, वस्तू ठेवल्या होत्या. काही दुकानासमोर फेरीवाले बसत आल्याने नागरिकांना त्रास होत होता. दुकानदारांनी फेरीवाल्यांना दुकानासमोर बसू देऊ नये असे मुंबरकर यांनी सांगितले.

सहायक आयुक्त मुंबरकर यांची फेरीवाल्यांवर कारवाई सुरु असताना वाहतुकीस अडचण निर्माण होई अशा प्रकारे रस्त्यावर दुचाकी पार्क पाहून त्या दुचाकींचे फोटो कर्मचाऱ्यांनी काढले. वाहतूक पोलिसांना या दुचाकीचे फोटो पाठवून कारवाई असे मुंबरकर यांनी यावेळी सांगितले.

## जी.एस.महानगर बँक निवडणूक प्रचाराचा नारळ फुटला

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●



**अहिल्यानगर :** जी.एस्.महानगर बँक निवडणूकीचा संस्थापक अध्यक्ष सॉलिसिटर गुलाबराव शेळके व अध्यक्ष श्रीमती सुमनताई गुलाबराव शेळके पॅनेल प्रचाराचा नारळ फुटला. पारनेर तालुका प्रतिनिधी श्री दीपक वरखडे पारनेर - जी एस् महानगर बँक संचालक मंडळाची पंचवार्षिक निवडणूक रविवार दि. १ जून रोजी होत असून या निवडणुकीसाठी विदयमान अध्यक्षा श्रीमती सुमनताई गुलाबराव शेळके यांच्या संस्थापक अध्यक्ष सॉलिसिटर गुलाबराव शेळके साहेब व श्रीमती सुमन गुलाबराव शेळके पॅनलच्या प्रचाराचा नारळ मुंबईतील कॉटन ग्रीन येथील श्रीराम मंदिरात मोठया संख्येने उपस्थित असलेल्या सभासदांच्या हस्ते फोडण्यात आला . या कार्यक्रमासाठी मुंबई , वाशी , ससूनडॉक , कळंबोली , पुणे , पारनेर येथील महानगर बँकेचे सभासद व अर्ज दाखल केलेले उमेदवार मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रथम श्रीमती सुमनताई यांच्या हस्ते श्रीरामाची विधीवत पूजा झाली. त्यानंतर प्रचाराचा नारळ फोडल्यानंतर सभासदांना निवडणूक निमित्ताने विनम्र आवाहन परिपत्रकाचा प्रकाशन सोहळा पार पडला. तद्नंतर उपस्थित मान्यवरांची समयोचित भाषणे झाली. लालबागचा राजा श्रीगणेशाचे दर्शन घेऊन मसाला गल्लीतून अध्यक्षा श्रीमती सुमन ताईंसह उमेदवार आणि प्रचारक यांनी भेटी व पत्र वाटपासाठी पदयात्रे व्दारे प्रारंभ केला. ही पदयात्रा गणेशगल्ली , मसाला गल्ली, चिवडा गल्ली, आला.बी.एस्. मार्ग, ते बँकेच्या मुख्य कार्यालया पर्यत येऊन समाप्त झाली. या वेळी विदयमान अध्यक्षा सुमनताईंची आदरातीर्थी, कृतज्ञता म्हणून,भर उन्हात आणि गर्दीत विचारपूस करीत होती. सॉलिसिटर गुलाबराव शेळके साहबने हम को यह दिन दिखाए ! " हे डोळयांत आनंद अश्रू आणून व्यक्त होत होती. हे भावनिकतेचे चित्र बरेच काही सांगून जात होते. [ चौकट - बँकेच्या स्थापनेपासून संस्थापक अध्यक्ष सॉलिसिटर गुलाबराव शेळके हे होत असलेल्या प्रत्येक मंडळाच्या पंचवार्षिक निवडणूकी मुंबईतील याच कॉटन ग्रीन मधील श्री राम मंदिरात सभासदांच्या हस्ते व उपस्थितीत प्रचाराचा नारळ फोडून शुभारंभ करत आले आहेत . आज जरी सॉलिसिटर गुलाबराव शेळके आपल्यात नसले , तरी त्यांची ही जुनी परंपरा बँकेच्या अध्यक्षा व पॅनल प्रमुख श्रीमती सुमनताई गुलाबराव शेळके पुढे चालू ठेवत आल्या आहेत . एक प्रकारे त्यांच्या वतीने दिवंगत गुलाबराव शेळके यांच्या स्मृतींना उजाळा देण्याचा प्रयत्न केला जात आहे .

## शहापूर तालुक्यातील लाचखोर नायब तासिलदारावर गुन्हा दाखल

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●

**ठाणे:** सातबारावरील नाव बदली करण्यासाठी मदतनीसामार्फत २५ हजारांची लाच मागणाऱ्या शहापूर येथिल नायब तहसीलदार यांच्या विरोधात शहापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दत्तात्रय बांबळे असे नायब तहसीलदार यांचे नाव आहे. ते शहापूर येथिल तहसीलदार कार्यालयात कार्यरत आहेत. जीवदानी संस्था विरार यांची वाशाळा आणि वेळूक या ठिकाणी जमिन आहे. या जमिनीच्या सात बारा उताऱ्यावर असलेल्या संचालकांची नावे बदली करण्यासाठी तक्रारदार यांनी मार्च महिन्यात अर्ज दाखल केला होता. या अर्जावर कारवाई करताना नायब तहसीलदार यांनी त्यांच्या मदतनीसामार्फत २५ हजार लाच मागितली होती. त्याबाबत पालघर येथे तक्रारदार यांनी तक्रार केली होती. या तक्रारीबाबत पडताळणी केली असता नायब तहसीलदार यांनी २५ हजारांची लाच मागितल्याचे स्पष्ट झाल्याने त्यांच्या विरोधात शहापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे .

## सह्याद्री प्रतिष्ठानच्या रक्तदान शिबिरात शेकडो महिला आणि तरुणांचा सहभाग

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

पेण ( प्रतिनिधी ) दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील सह्याद्री प्रतिष्ठानने ओम साई ब्लड बँक पनवेल यांच्या सहकाऱ्याने पेण येथील महात्मा गांधी सार्वजनिक वाचनालयाच्या सभागृहात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन आज रविवारी केले होते. सदर शिबिरामध्ये पेण तालुक्यातील तरुण वर्ग तसेच महिला वर्गाने उत्स्फूर्तपणे सहभाग दर्शविला. राज्यातील गड संवर्धन आणि इतर सामाजिक कार्यात नेहमीच एक पाऊल पुढे असणाऱ्या सह्याद्री प्रतिष्ठानने दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात





आले होते. यावेळी बोलताना सह्याद्री प्रतिष्ठान हिंदुस्थानचे महाराष्ट्र राज्य कार्याध्यक्ष समीर म्हात्रे यांनी दरवर्षी आम्ही धर्मवीर संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्ताने शिबिर पार पडत आहे.

मात्र यावेळी देशात युद्धाचे सावट असल्याने जे सीमेवर युद्ध सुरू आहे त्या जवानांना वेळ पडल्यास रक्ताची कमतरता भासू नये यासाठी आम्ही हे शिबिर आयोजित केले असून सोशल मीडियाद्वारे येथील संस्था, मंडळे यांना आवाहन केल्यानंतर शेकडो रक्तदाते आज सहभागी झाले. गतवर्षी शिबिरात 391 रक्तदात्यांनी सहभाग घेतला होता यावर्षी पाचशे हून अधिक रक्तदाते या शिबिरात सहभागी होतील अशी त्यांनी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी पेण तालुक्यातील विराज म्हात्रे आणि श्वेता म्हात्रे यांनी आपल्या लग्नाचा वाढदिवस रक्तदान करून एक आगळावेगळा संदेश दिला. सदर शिबिराला ओम साई ब्लड बँक पनवेलचे डॉ. बनकर, सचिन पाटील, प्रतिमा गवते, निकिता चोरट, ऋतुजा पाटील, किशोर बडगुजर आदी डॉक्टर उपस्थित होते तर हे शिबिर संपन्न करण्यासाठी सह्याद्री प्रतिष्ठान हिंदुस्थानचे कार्याध्यक्ष समीर म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली तालुका अध्यक्ष साईराज कदम, प्रशासक अच्युत पाटील, रोशन टेमघरे, केतन म्हात्रे, रोहित केणी यांसह सह्याद्री प्रतिष्ठानचे शेकडो मावळे उपस्थित होते.

## विषयशिक्षक पदावर जिल्हा परिषदेच्या ३२ शिक्षकांची पदोन्नती

**११ वर्षापासून प्रलंबित पदोन्नतीची समस्या मार्गी**

**६ वी ते ८ वीच्या शाळांना विषयनिहाय शिक्षक**



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** प्रतिनिधी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली व सातत्याने पाठपुराव्यामुळे जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत शिक्षण विभागातील मराठी माध्यम भाषा 40, विज्ञान 90 व उर्दू माध्यम भाषा 02 अशा एकूण 132 पात्र शिक्षकांना विषयशिक्षक म्हणून पदोन्नती देण्यात आली. सदर पदोन्नती ही मागील 11 वर्षापासून प्रलंबित होती. यामुळे इयत्ता 6 वी ते 8 वीच्या शाळांना विषयनिहाय शिक्षक उपलब्ध होणार आहेत. सदरचा विषय मार्गी लावण्यासाठी शिक्षणाधिकारी बाळासाहेब राक्षे, अधीक्षक सारासे, बी. ए. गोमासे, विस्तार अधिकारी (शिक्षण) आशिष झुंजारराव तसेच शिक्षण विभागातील सहाय्यक प्रशासन अधिकारी, कनिष्ठ प्रशासन अधिकारी व कर्मचारी यांनी यासाठी प्रयत्न केले. यावेळी शिक्षक व शिक्षण विभागातील अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिक्षकांना दिल्या जाणाऱ्या विविध लाभाबाबत वेळोवेळी विशेष पाठपुरावा घेत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी शिक्षण विभागातील 132 शिक्षकांना पदोन्नतीचा लाभ देण्यात आला आहे. याबाबत संबंधित शिक्षक व शिक्षक संघटना यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे यांचे आभार व्यक्त केले.

## शिवसेना उबाठा पक्षाचे रक्तदान शिबीर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

युद्ध जन्य परिस्थितीमध्ये रक्ताची कमतरता पडू नये याकरिता उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे रक्तदान शिबिर देशावर आलेल्या संकटासाठी भारत पाकिस्तानचे युद्ध सुरू झाले आहे त्यामध्ये सैनिक जखमी सैनिकांना जर रक्ताची आवश्यकता लागली तर ते रक्त कमी पडू नये याकरता उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी देशभर आपल्या शिवसैनिकांना रक्तदान करण्याचे आवाहन केले आहे त्याच अनुषंगाने आज डोंबिवलीतील ठाणे जिल्हाप्रमुख दीपेश म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली भव्य असे रक्तदान शिबिर डोंबिवली करण्यात आले यामध्ये सकाळपासूनच शिवसैनिकांनी चांगला प्रतिसाद दिला

## 'भूल चूक माफ'च्या ओटीटी प्रदर्शनाला उच्च न्यायालयाची स्थगिती

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** राज कुमार राव अभिनित भूल चूक माफ या चित्रपटाच्या १६ मे रोजी होणाऱ्या ओटीटी प्रदर्शनाला उच्च न्यायालयाने शुक्रवारी स्थगिती दिली. त्यामुळे, पीव्हीआर आयनॉक्स लिमिटेडला अंतरिम दिलासा मिळाला आहे. चित्रपटाच्या चित्रपटगृहांतील प्रदर्शनाच्या कराराचे उल्लंघन केल्याचा दावा करून पीव्हीआरने चित्रपटाच्या निर्मात्यांविरोधात उच्च न्यायालयात धाव घेतली होती. तसेच, चित्रपटाच्या ऑनलाईन प्रदर्शनाला स्थगिती देण्याची मागणी केली

भारतीय जनता पार्टी तर्फे

## डोंबिवलीत भव्य महारोजगार मेळावा



**हजारापेक्षा जास्त नोकऱ्यांची संधी**

**नोकरीसाठी इच्छुकांनी सर्व कागदपत्रांसहित उपस्थित राहण्याचे आवाहन**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली :** भारतीय जनता पार्टी कल्याण ग्रामीण मंडळ आयोजित 2025,, भव्य महारोजगार मेळाव्यातर्फे , 25 पेक्षा अधिक नामांकित कंपन्यांमध्ये नोकरीची संधी युवक युवतींना उपलब्ध करून देण्याकरिता हा महारोजगार मेळावा डोंबिवलीतील स्वामी विवेकानंद शाळेतील प्रांगणात रविवार दिनांक 11 मे 2025 रोजी दिवसभर म्हणजे सकाळी नऊ वाजेपासून सायंकाळी पाच वाजेपर्यंत या रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

शिक्षण कमीत कमी आठवी ते ग्रॅज्युएट आणि पोस्ट ग्रॅज्युएट असलेल्या युवक आणि युवतींना अर्ज करून इंटरव्यू घेऊन तात्काळ नोकरीचे अपॉइंटमेंट लेटर देण्यात येत आहे. या सुवर्णसंधीचा लाभ घेण्यासाठी डोंबिवली, कल्याण आणि ग्रामीण भागातील युवक युवतींनी मोठ्या प्रमाणात उपस्थिती दर्शवली होती.या महारोजगार कार्यक्रमात माजी मंत्री जगन्नाथ पाटील, विशू पेडणेकर, निलेश म्हात्रे, बाळा पवार, माजी नगरसेवक मंदार टावरे, उपस्थित होते.

## सुट्टीच्या दिवशी बेलापूर–पेंधर मार्गावर १५ मिनिटांनी मेट्रो



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई:** मेट्रो गाड्यांच्या नियमित देखभालीकरिता, सिडकोतर्फे रविवार आणि सार्वजनिक सुट्ट्यांच्या दिवशी नवी मुंबई मेट्रो मार्ग क्र. 1 बेलापूर ते पेंधरवर धावणाऱ्या मेट्रो सेवांच्या वेळेमध्ये बदल करण्यात आला असून त्याबाबतचे सुधारित वेळापत्रक 11 मे 2025 पासून अंमलात येणार आहे. सुधारित वेळापत्रकानुसार रविवारी आणि सार्वजनिक सुट्ट्यांच्या दिवशी बेलापूर मेट्रो स्थानक आणि पेंधर मेट्रो स्थानक येथून सकाळी 6 वाजता पहिली मेट्रो रवाना होईल. तर शेवटची मेट्रो फेरी बेलापूर मेट्रो स्थानक येथून रात्री 10 वाजता व पेंधर मेट्रो स्थानक येथून रात्री 9.45 वाजता होणार आहे.

या दिवशी दर 15 मिनिटांनी मेट्रोची फेरी उपलब्ध असणार आहे. रविवार व सार्वजनिक सुट्ट्या वगळता इतर दिवशी नेहमीच्या वेळापत्रकाप्रमाणे मेट्रो सेवा उपलब्ध असणार आहे.

## सोशल मिडिया व संस्कार शिबीरात मिळणार मामाचे गावी होणारे अनौपचारिक संस्कार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : प्रतिनिधी वार्षिक परीक्षा संपलीरे संपली की मुलांना उन्हाळ्याच्या सुट्यांची चाहूल लागते. मुले या सुट्टयांची आतुरतेने वाट पाहत असतात. मे महिना म्हणजे उन्हाळी सुट्ट्याचा, आनंदाचा, संस्काराचे देवाण घेवाणीचा महिना असतो. मुले वर्षभर शाळा व अभ्यासात गुंतल्यामुळे उन्हाळयाचे सुट्टयांमध्ये मामाच्या गावाला जाण्यासाठी तयारच असतात. मामाच्या गावी जास्त लाड केले जातात. हट्ट पुरविले जातात. एवढेच नव्हे तर सर्वच स्वातंत्र्य मिळालेले असते. परंतू शासनाच्या बदललेल्या धोरणामुळे यावर्षी वार्षिक परीक्षा उशिरा झाल्या. एक मे रोजी विद्यार्थ्यांना खऱ्या अर्थाने उन्हाळ्याच्या सुट्ट्या लागल्या आणि लगेच नवीन शैक्षणिक वर्षातील वर्गांचे खाजगी शिकवणी वर्ग मे महिन्यात मिळणाऱ्या उन्हाळ्याच्या सुट्टीमध्ये सुरू झाले. एवढेच नव्हे तर इयत्ता 12 वीचा निकाल सुद्धा लवकर लागल्यामुळे पदवी प्रवेशासाठी नोंदणी व अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया मे महिन्यामध्ये सुरू झाली आहे. नव्यानेच सुरु होणारे CBSCचे वर्ग. यामुळे पालक मुलांना चांगल्या शाळेत, कॉलेजमध्ये प्रवेश मिळण्यासाठीच्या धावपळीमध्ये तर मुले खाजगी शिकवणी वर्गात गुंतलेले असल्यामुळे तसेच मामा रोजंदारीसाठी, नोकरीसाठी शहराकडे वाटचाल करत आसल्याने मुलांना झुक झुक झुक झुक अगीणगाडी...धुरांच्या रेघा हवेत काढी...पळती झाडे पाहूया मामाच्या गावाला जाऊया... या गाण्याचा विसर पडला आहे. व बदलत्या शैक्षणिक धोरणामुळे मामाच्या गावच्या वाटा सुद्धा घुसुर झाल्या आहेत. शहरी जीवन पद्धतीमध्ये मुलांचे बालपण नष्ट होत आहे. पालक वर्षभर दप्तराचे ओझे वाहणाऱ्या मुलांकडून उन्हाळ्याच्या सुट्टीमध्ये नको इतक्या अपेक्षा करीत आहेत. सध्याच्या इंटरनेट आणि संगणकाच्या युगात मामाचे गाव दिसेनासे झाले आहे. मामाच्या गावाची धमाल तेथील खेळाची व मौजमस्ती ची जागा आता एम.एस.सी.आय.टी. चा क्लास, चित्रकला वर्ग, संगीत, कराटे, उन्हाळी शिबीर, पुढच्या वर्षाचा अभ्यासक्रम शिकवण्यासाठी उन्हाळी सुट्टीतील खाजगी शिकवणी वर्ग यांनी घेतली आहे. बदलती शिक्षण पद्धती, पालकांच्या वाढत्या अपेक्षा व जीवघेण्या स्पर्धा यामुळे शालेय मुलांचा वेळ बऱ्याचवेळा मैदाना ऐवजी विविध प्रकारच्या शिकवण्या, अभ्यास करणे यामध्ये जातो. चार भिंतींच्या आतील कोंडमारा युक्त जीवन जगत असताना विद्यार्थी नेहमीच प्रचंड तणावाखाली असल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे. शालेय जीवनातील वाढत्या ताणामुळे विद्यार्थ्यांमध्ये नैराश्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. सध्या शहरांमध्ये मैदान नसल्यामुळे मुले घरामध्ये बसून मोबाईलमध्ये रिल्स पाहणे, गेम खेळून यामध्ये गुंतून आपला दिवस मार्गी लावत आहेत. यामुळे मुलांना डोळ्याचे आजार, मानसिक ताण तणाव वाढत आहेत. मुलांमध्ये चिडचिडेपणा दिसून येत आहे. या सर्व समस्या निर्माण झाल्यामुळे सध्या मानसोपचार तज्ज्ञांकडे विद्यार्थी व पालकांची गर्दी होत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. या ताणतणावातून मुलांना बाहेर काढायचे असेल तर शाळेनंतर विद्यार्थ्यांनी धमाल-मस्ती व मैदानी खेळांमध्ये सामिल होण्याची गरज असल्याचे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. आणि यासाठी मामाचे गाव हे एकच पर्याय ठरत आहे. परंतु स्पर्धेच्या युगात आणि यांत्रिकीकरणाच्या जमान्यात मामाचे गाव मुलांच्या जीवनातून लोप पावत चालले आहे. मामाच्या गावी गेल्यावर ग्रामिण जीवन पद्धतीचा परिचय होतो. मामाच्या घरी एकत्रित कुटुंब पद्धतीतील नाते, संस्कार अत्यंत प्रभावी होते. सर्व नातेवाईक या सुट्टीच्या काळात सर्व एकत्र आलेले असतात. मुलांना या नात्यांची ओळख होते तसेच नातेसंबंधांनी कुटुंब व समाज समृद्ध होतो. मुलांवर यामधून अप्रत्यक्षरीत्या विविध प्रकारचे संस्कार होत असतात. संवाद कौशल्य, जिज्ञासा वृत्ती, संभाषण कला, भावनिक प्रगल्भता विकसित होतात. आई-वडिलांशिवाय आपली काळजी करणारे, आधार देणार आपले नातेवाईक आहेत अशी सुरक्षिततेची भावना निर्माण होऊन आत्मविश्वास वाटतो. तेथील शेती, शेतीतील विहीर, तलाव, मंदिर, बागा, डोंगर येथे मनसोक्त भटकणे, विहिरीत पोहणे, कैऱ्या खाणे, विविध प्रकारचे खेळ खेळणे, लपाछपी, लंगडी, गोट्या खेळणे, कबड्डी, हुतूतू, खोखो, सागरगोटे, पत्ते, कॅरम, भेंडया, विटी-दांडू, पकडा-पकडी, वडाच्या पारंब्याचा झोका खेळणे, झाडावर सूरपारंब्याचा खेळ खेळणे, सायकल चालवणे असे एक ना अनेक प्रकारचे खेळ खेळून मौज - मस्ती करायला मिळत असते. म्हणून मुलांना मामाच्या गावी जाण्याचे वेध लागले आहेत. यासारख्या खेळांमधून मुलांचा शारीरिक तसेच मानसिक व्यायाम होतो. मुलांना शेती, शेतीचे प्रकार, मातीचे प्रकार, पिकांची लागवड, झाडे फुले, फळे, विविध शेतीपूरक व्यवसाय, पक्षी, जनावरे, नाते संबंध, कुटुंब पद्धती हे सर्व पुस्तकी ज्ञान मामाचे गाव शिकवते. यासाठी कुठल्याही क्लासमध्ये किंवा शाळेमध्ये जाऊन शिक्षण घेण्याची गरज नसते. हे प्राथमिक शिक्षण मुलांना मिळणे गरजेचे आहे. आणि हे शिक्षण मामाच्या गावी नकळतपणे मिळते. मामाचा गाव ही सध्याची कृतीयुक्त आणि हसत-खेळत शिक्षणाची पद्धती असून संस्काराची शाळा आहे. खेळ, कृती, उपक्रम आणि मुक्त शिक्षण हे नवीन शैक्षणिक धोरणातील उद्दिष्टे मामाचे गाव पूर्ण करते असे शैक्षणिक संस्थेतील जाणकार सांगतात. परंतु मामाचे गावच्या वाटा धुसूर झाल्यामुळे मामाचे गावी होणारे अनौपचारिक संस्कार आता सोशल मिडिया व संस्कार शिबीरातून मिळणार आहे.




'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९०८२६ ६४७८१
E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com